cmyk

## संपादकीय

### मार्चमध्येच चाळिशीचा पारा : बदलत्या हवामानाची गंभीर चाहूल

मागील काही वर्षांपासून राज्यासह देशात ऋतूंचे वेगळेच चक्र अनुभवास येत आहे. पूर्वी निसर्गाच्या ठरावीक लयीत चालणारे ऋतुचक्र आता विस्कळीत होत असल्याचे चित्र दिसू लागले आहे. कधी पावसाचा अतिरेक, कधी कडाक्याचे ऊन, तर कधी अपेक्षित थंडीच न पडणे या सर्व घटना हवामानातील मोठ्या बदलांची साक्ष देत आहेत. एकेकाळी ठरावीक वेळी येणारे ऋतू आता अनियमित झाले असून त्याचा थेट परिणाम शेती, अर्थव्यवस्था आणि मानवी जीवनावर होताना दिसत आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३११ | सोमवार दि.०९ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### सरसकट कर्जमाफी करणे गरजेचे–बाळासाहेब थोरात

अहिल्यानगरः दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी फारशी उपयोगी ठरणार नाही. सरसकट कर्जमाफी करून एकदा शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून मुक्त करणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त सांगितले. माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर (ता. अहिल्यानगर) येथे माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, की महाविकास आघाडीचे सरकार असताना आम्ही दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी केली होती. मात्र, आता कर्जाचे प्रमाण बऱ्यापैकी वाढले आहे, त्यामुळे सरसकट कर्जमाफी करणे गरजेचे होते. जे शेतकरी नियमित कर्ज भरतात, त्यांना एक लाख रुपयांची सवलत देणेही योग्य आहे. पण आता काळ बदलला आहे, असे ते म्हणाले.

### इराणच्या तेल साठ्यांवर इस्त्रायलचे भीषण हल्ले

तेहरान : इस्त्रायलने इराणविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, इराणच्या अनेक तेल डेपोंवर हल्ले केले. परिणाम तेहरान आणि शेजारील कारज शहर स्फोटांमुळे हादरले होते. यामुळे आकाशात आगीचे आणि धुराचे मोठे लोळ उठले होते. सोशल मीडियावर फिरणाऱ्या व्हीडीओंमध्ये हल्ल्याच्या ठिकाणांहून मोठ्या प्रमाणात ज्वाळांचे लोळ उठताना दिसत आहेत. गेल्या आठवडाभरात अमेरिका आणि इस्त्रायलने इराणच्या सर्व ऊर्जा पायाभूत सुविधांवर हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये तेहरान आणि अल्बोर्झ प्रांतातील अनेक तेल साठवणूक डेपोंना लक्ष्य करण्यात आले होते. तेहरानच्या पश्चिमेला असलेल्या कारजमधील एका डेपोवरही हा हल्ला झाला. तेहरानचा मुख्य तेल शुद्धीकरण प्रकल्प शहर रे जिल्ह्याजवळ आहे. यावरही हल्ला करण्यात आला होता. वायव्य तेहरानमधील शहरान तेल डेपोवर गेल्या जून महिन्यात हल्ला केला होता. त्यानंतर पुन्हा एकदा हल्ला करण्यात आला. यामुळे आगीची धग अद्यापही कमी झालेली नाही.

### महिला दिनानिमित्त नागपुरात 'पिंक मॅरेथॉन'

नागपूरः ८ मार्चला जगभरात महिला दिन साजरा केला जातो. याच जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत नागपूर महानगरपालिकेतर्फे 'पिंक मॅरेथॉन'चे आयोजन करण्यात आले होते. या 'पिंक मॅरेथॉन'ला नागपूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी समाजसेविका अमृता फडणवीस यांच्या हस्ते या मॅरेथॉनला हिरवी झेंडी दाखवत सुरुवात करण्यात आली. यावेळी मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या हजारो महिलांनी धावत स्त्री–शक्तीचा जयघोष केला. या मॅरेथॉनच्या सुरुवातीला अमृता फडणवीस यांनी मंचावर उपस्थित राहून महिलांचे मनोबल वाढवले. महिलांच्या आग्रहाखातर त्यांनी मंचावर काही गाणी सादर केली. तसेच उपस्थित महिलांसोबत झुंबा डान्सवर ठेका धरला. त्यांच्या या सहभागामुळे कार्यक्रमात एक वेगळीच रंगत आली होती. यावेळी प्रसारमाध्यमांशी अमृता फडणवीस मनमोकळेपणाने संवाद साधला.

# कर्जमाफी जाहीर; पण पूरग्रस्त शेतकरी वंचित?

## अर्थसंकल्पात २ लाखांपर्यंत दिलासा; मात्र अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि नाराजी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य शासनाने शुक्रवारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करत राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजीपर्यंत थकित असलेल्या पीक कर्जावर पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच जे शेतकरी नियमितपणे कर्जफेड करतात, त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचेही सरकारने जाहीर केले आहे. मात्र, या घोषणेनंतर लगेचच पूरग्रस्त आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. कारण योजनेत कर्जमाफीसाठी ३० सप्टेंबर २०२५ ही मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे जून, जुलै आणि ऑगस्ट २०२५ मध्ये कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**



गेल्या वर्षी राज्यात जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत मुसळधार पाऊस आणि पुराने थैमान घातले होते. अनेक जिल्ह्यांतील नदीकाठच्या गावांमध्ये शेतीचे मोठे नुकसान झाले होते. हजारो शेतकऱ्यांची पिके वाहून गेली, तर काही ठिकाणी शेतजमीनच उद्ध्वस्त झाली. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मदत जाहीर केली होती; मात्र ती मदत अत्यंत तुटपुंजी असल्याची टीका त्या वेळी शेतकरी आणि विरोधकांकडून करण्यात आली होती. त्यावेळी विरोधी पक्षांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला होता. राज्यभर दौरे करून अनेक नेत्यांनी पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले होते. सरकारने सर्वांना सरसकट मदत न दिल्याने अनेक ठिकाणी नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. आता नव्याने जाहीर झालेल्या कर्जमाफी योजनेमुळे पुन्हा एकदा अतिवृष्टी आणि पूरग्रस्त शेतकरी वंचित राहणार का? अशी भीती व्यक्त केली जात

▶▶ पान २ वर

# व्हीएसआर कंपनीच्या मालकाच्या मुलाच्या लग्नाला कोण कोण होते?

## रोहित पवारांकडून प्रफुल्ल पटेल यांना आव्हान

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार हे विविध शंका उपस्थित करत तपास यंत्रणांना धारेवर धरत आहेत. तसेच राजकीय दबावामुळे या विमान अपघाताची योग्य चौकशी होत नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. अशातच रोहित पवार यांनी राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांना आता खुले आव्हान दिले आहे. "अपघातग्रस्त विमान ज्या कंपनीचे**



**होते त्या व्हीएसआर कंपनीच्या मालकाच्या मुलाच्या लग्नाला तुम्ही गेला होता का आणि तिथे कोणकोणते राजकीय नेते उपस्थित होते, हे महाराष्ट्राला सांगा, असे रोहित पवार यांनी प्रफुल्ल पटेलांना उद्देशून म्हटले आहे.**

रोहित पवार यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, मिस्टर प्रफुल्ल पटेलजी (माजी केंद्रीयनागरी उड्डाणमंत्री) आपणास विनंती करतो की, अजितदादांच्या अपघाताला/ घातपातला कारणीभूत असलेल्या व्हीएसआर कंपनीच्या मालकाचा मुलगा रोहित सिंग याचा राजस्थानमध्ये जो विवाहसोहळा पार पडला तिथे आपण गेला होतात का आणि गेला असाल तर त्या लग्नात आणखी कोणते

▶▶ पान २ वर

# युद्धग्रस्त भागांत अडकलेल्या भारतीयांसाठी एअर इंडिया आणि इंडिगोकडून अतिरिक्त विमानांची घोषणा

नवी दिल्ली । वृतसंस्था

**पश्चिम आशियातील सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर, एअर इंडिया, एअर इंडिया एक्स्प्रेस आणि इंडिगो आपल्या प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी महत्त्वाची पावती दिली आहे. जेद्दाह आणि मस्कत ही शहरे विमान प्रवासासाठी सुरक्षित असल्याचे स्पष्ट करत, या ठिकाणची नियमित विमान सेवा सुरू राहणार असल्याचे कंपन्यांनी जाहीर केले आहे.**






विविध देशांत अडकलेल्या भारतीय प्रवाशांना मायदेशी परत आणण्यासाठी एअर इंडियाने कंबर कसली आहे. त्यानुसार ८ मार्च रोजी अबु धाबी, दुबई, मस्कत, रास अल–खैमाह आणि शारजाह येथून विशेष (नॉन–शेड्युल्ड) विमानांचे नियोजन करण्यात आले आहे. अडकलेल्या प्रवाशांना भारतात परत आणण्यासाठी एअर इंडियाने ८ मार्च रोजी अबू धाबी, दुबई, मस्कत, रास अल–खैमाह आणि शारजाह येथून ३० हून अधिक अतिरिक्त विमानांचे नियोजन केल्याचे म्हटले आहे. दरम्यान,

▶▶ पान २ वर

# अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून !

## इराण-इस्त्रायल संघर्ष, 'एपस्टीन फाईल्स'वरून वातावरण तापण्याची शक्यता!



नवी दिल्ली । वृतसंस्था

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याला सोमवारपासून सुरुवात होत असून, अधिवेशनादरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र राजकीय संघर्ष होण्याची शक्यता आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरून विरोधक सरकारला कोंडीत पकडण्याच्या तयारीत आहेत, तर अधिवेशन सुरळीत चालवणे हे केंद्र सरकारसमोर मोठे आव्हान असणार आहे.

अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात इराण–इस्त्रायल संघर्षाचा मुद्दा तसेच अमेरिकेची भूमिका संसदेतील चर्चेचा प्रमुख विषय ठरण्याची शक्यता आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा भारताच्या

▶▶ पान २ वर

# पुण्यातील सिंहगड कॉलेजच्या एचओडीची आत्महत्या

पुणे । प्रतिनिधी

शहरातील शैक्षणिक क्षेत्राला हादरवून टाकणारी घटना समोर आली असून सिंहगड डेंटल कॉलेजमधील विभागप्रमुखांनी राहत्या घरी आत्महत्या केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. या घटनेमुळे महाविद्यालयीन वर्तुळात खळबळ उडाली असून पोलिसांना घटनास्थळी आत्महत्येपूर्वी लिहिलेली सुसाईड नोटही सापडली आहे. आत्महत्या केलेल्या प्राध्यापकांचे नाव राजू पाटील असे असून, ते सिंहगड डेंटल कॉलेज येथे विभागप्रमुख (एचओडी) म्हणून कार्यरत होते. त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे कुटुंबीयांसह सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांमध्ये शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना शनिवारी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. त्या वेळी पाटील

▶▶ पान २ वर

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा २० वा वर्धापन दिन

## राज ठाकरे रायगडावरून सदस्य नोंदणीचा करणार शुभारंभ



रायगड । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा २० वा वर्धापन दिन सोमवार (दि. ९ मार्च) रोजी साजरा होत असून, पक्षप्रमुख राज ठाकरे रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ करणार आहेत. याबाबत राज ठाकरे यांनी आपल्या 'एक्स' हँडलद्वारे राज्यातील सर्व महाराष्ट्र सैनिकांना आवाहन केले आहे.

राज ठाकरे यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे की, ९ मार्च २०२६ रोजी पक्षाचा २० वा वर्धापन दिन आहे. मराठी माणूस आणि मराठी भाषेसाठी आक्रमकपणे लढणाऱ्या या पक्षाचा हा महत्त्वाचा टप्पा आहे. या निमित्ताने १० मार्चपासून पक्षाची सदस्य नोंदणी सुरू करण्यात येणार आहे. त्याआधी ९ मार्च रोजी

▶▶ पान २ वर

# गॅस सिलिंडर काटसकरीने वापरावे लागणार; २५ दिवसांनंतर मिळणार सिलिंडर!

पुणे । प्रतिनिधी

इराण–इस्राईलमधील युद्धाचा परिणाम थेट गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर झाला आहे. युद्धामुळे होणारी गॅसची आयात प्रभावित झाली आहे. त्यामुळे सध्या उपलब्ध असलेल्या गॅसचे तीनही कंपन्यांकडून नियोजन करण्यात आले आहे. आता



पहिला घरगुती गॅस सिलिंडर मिळाल्यानंतर दुसऱ्या सिलिंडरचे बुकिंग करण्यासाठी २५ दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे घरगुती गॅस सिलिंडरचे वाटप काटकसरीने करावे लागणार आहे.

पहिल्या गॅस सिलिंडरची डिलिव्हरी झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी सिलिंडर बुकिंग करता येणार नाही. मोबाईलवरून

▶▶ पान २ वर

# पुन्हा विश्वविजेता..

अहमदाबाद । वृतसंस्था

२०२४ मध्ये विराट कोहली यांच्या नेतृत्वाखाली भारताने टी २० विश्वचषक जिंकला होता आता पुन्हा एकदा भारताने विश्वचषकावर आपले नाव कोरले आहे. अहमदाबाद येथील स्टेडियमवर सुरू असलेल्या या अंतिम सामन्यात न्यूझीलंड विरूध्द २५० पुढे आवाहन दिली होते.

▶▶ पान २ वर





## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०७ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७१.०० क्विंटल | २,०१० | २,७४० | २,३९० |
| ज्वारी/हायब्रिड : ६६.५० क्विंटल | २,२०० | ३,८०४ | ३,०८२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ७.०० क्विंटल | ६,७०० | ७,५९० | ७,०८५ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: १.०० क्विंटल | २,५२० | २,५२० | २,५२० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: ३०.०० क्विंटल | ५,३५० | ५,४०० | ५,३८३ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,४५१ | ४,४५१ | ४,४५१ |

# आयपीएल २०२६ चं बिगुल वाजलं !

## २८ मार्चपासून सुरु होणार क्रिकेटचा महाकुंभ

मुंबई । प्रतिनिधी

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील विश्वचषक फायनलच्या पूर्वसंध्येला ब्रॉडकास्टर स्टार स्पोर्ट्सने आयपीएल २०२६ च्या सुरुवातीची तारीख जाहीर केली आहे. यंदा आयपीएलच्या १९व्या हंगामाला २८ मार्च पासून सुरूवात होणार असल्याचे निश्चित झाले आहे. मात्र, अद्याप संपूर्ण सामन्यांचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात**





आलेले नाही.

बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक राज्यांमध्ये असलेल्या निवडणुकांचे वेळापत्रक आणि मतमोजणीच्या तारखांमुळे आयपीएलचे नियोजन करणे आव्हानात्मक ठरत आहे. मतदानाच्या दिवशी सामने आयोजित केल्यास सुरक्षा व्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे अधिकृत तारखा निश्चित करण्यापूर्वी बोर्ड निवडणूक आयोगाच्या पुष्टीची वाट पाहत आहे. गेल्या हंगामात

### सुरक्षेच्या उपाययोजनांवर विशेष भर

गेल्या वर्षी जूनमध्ये आयपीएल २०२५ च्या जेतेपदाच्या सेलिब्रेशन दरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमवर चेंगराचेंगरी झाली होती, ज्यात ११ जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर स्टेडियममध्ये सुरक्षा आणि गर्दी व्यवस्थापनाचे नियम अत्यंत कडक करण्यात आले आहेत. आरसीबीने बेंगळुरूमध्ये सामने आयोजित करण्यासाठी कर्नाटक सरकार आणि पोलिसांचे आभार मानले आहेत.

पंजाब किंग्सला सहा धावांनी हरवून जेतेपद पटकावणारा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ यंदा डिफेंडिंग चॅम्पियन म्हणून मैदानात उतरेल. कर्नाटक स्टेट क्रिकेट असोसिएशनने जाहीर केल्यानुसार, एम. चिन्नास्वामी स्टेडियम आरसीबीच्या पाच होम मॅचेससह स्पर्धेचा अंतिम सामना आणि एक प्ले–ऑफ सामना आयोजित करेल. आरसीबीचे उर्वरित दोन होम सामने रायपूरमधील शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवले जातील.

cmyk

अग्रलेख

# मार्चमध्येच चाळिशीचा पारा : बदलत्या हवामानाची गंभीर चाहूल

मागील काही वर्षांपासून राज्यासह देशात ऋतूंचे वेगळेच चक्र अनुभवास येत आहे. पूर्वी निसर्गाच्या ठरावीक लयीत चालणारे ऋतुचक्र आता विस्कळीत होत असल्याचे चित्र दिसू लागले आहे. कधी पावसाचा अतिरेक, कधी कडाक्याचे ऊन, तर कधी अपेक्षित थंडीच न पडणे या सर्व घटना हवामानातील मोठ्या बदलांची साक्ष देत आहेत. एकेकाळी ठरावीक वेळी येणारे ऋतू आता अनियमित झाले असून त्याचा थेट परिणाम शेती, अर्थव्यवस्था आणि मानवी जीवनावर होताना दिसत आहे.

जगाच्या पाठीवर उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे तीन प्रमुख ऋतू प्रामुख्याने भारत, बांगलादेश, पाकिस्तान आणि नेपाळसारख्या आशियाई देशांमध्ये प्रकर्षाने जाणवतात. हे सर्व देश मान्सून हवामानाच्या पट्ट्यात येतात. या प्रदेशात पावसावर आधारित जीवनशैली आणि शेती व्यवस्था विकसित झाली आहे. त्यामुळे मान्सूनमधील अगदी छोटासा बदल देखील येथे मोठे परिणाम घडवू शकतो.

भारतीय परंपरेनुसार ऋतूंची गणना अधिक सूक्ष्म पद्धतीने केली जाते. सूर्याच्या नक्षत्रांमधील भ्रमणावर आधारित सहा ऋतू मानले जातात. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर असे हे सहा ऋतू प्रत्येकी सुमारे दोन महिन्यांचे असतात. चैत्र-वैशाखमध्ये वसंत, ज्येष्ठ-आषाढमध्ये ग्रीष्म, श्रावण-भाद्रपदमध्ये वर्षा, आश्विन-कार्तिकमध्ये शरद, मार्गशीर्ष-पौषमध्ये हेमंत आणि माघ-फाल्गुनमध्ये शिशिर असे ऋतूंचे चक्र भारतीय संस्कृतीत वर्णन केलेले आहे. नक्षत्रांच्या चक्राशी जोडलेल्या या ऋतूंच्या आधारावर पावसाचा अंदाज देखील वर्तवला जात असे. निसर्ग आणि खगोलशास्त्र यांचा सुंदर समन्वय या परंपरेत दिसून येतो.

एकेकाळी या सहा ऋतूंचे सहा सोहळे निसर्ग साजरे करत असे. प्रत्येक ऋतूची आपली विशिष्ट लय, रंग आणि सौंदर्य होते. परंतु वाढते प्रदूषण, जंगलतोड, औद्योगिक विस्तार आणि मानवी हस्तक्षेप यामुळे या नैसर्गिक चक्राला धक्का बसला आहे. हवामानातील बदल आता स्पष्टपणे जाणवू लागले असून ऋतुचक्राचा समतोल ढासळताना दिसत आहे.

याचे ठळक उदाहरण म्हणजे सरत्या वर्षात अनुभवलेला दीर्घ पावसाळा. अनेक भागात जवळपास सहा महिने पावसाचे वातावरण होते. मान्सून संपल्यानंतरही अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे नदीनाल्यांमधील पाण्याची पातळी वाढली असली तरी शेतीवर त्याचा विपरीत परिणाम झाला. द्राक्ष, कांदा, सोयाबीन यांसारख्या पिकांच्या उत्पादनावर अतिवृष्टीचा मोठा परिणाम झाला. पिकांची गुणवत्ता घसरली, रोगराई वाढली आणि शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. पावसाचा हंगाम वाढल्यामुळे यंदा थंडी जास्त पडेल आणि उन्हाची तीव्रता कमी असेल असा अंदाज व्यक्त केला जात होता. परंतु वास्तव चित्र वेगळेच दिसत आहे. जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात अपेक्षित 'गुलाबी थंडी'च अनुभवायला मिळाली नाही. थंडीने जणू राज्यातून गाशा गुंडाळला आणि मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाने आपले प्रखर रूप दाखवण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील तापमान मार्चच्या पहिल्याच आठवड्यात चाळिशीच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. सरासरीपेक्षा तीन ते सहा अंशांनी तापमान वाढल्याचे चित्र आहे. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार विदर्भातील अकोला येथे ३९.३ अंश सेल्सिअस इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली आहे, तर जळगाव येथे किमान तापमान १५.६ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. मुंबईसह कोकण किनारपट्टीवर उष्णतेसोबतच दमट हवामान वाढले असून सांताक्रूझ येथे ३८.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने मार्च ते मे या तीन महिन्यांत देशातील अनेक भागांत तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा इशारा दिला आहे. फेब्रुवारी महिन्याचे सरासरी तापमान यावर्षी २८.७८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले असून ते नेहमीपेक्षा जास्त आहे. पुढील काही दिवसांत राज्यात उन्हासोबतच अवकाळी पावसाची शक्यता देखील व्यक्त करण्यात आली आहे. उत्तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांत तुरळक पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून मुंबईसह कोकण किनारपट्टीला यलो अलर्ट देण्यात आला आहे. या बदलत्या हवामानाचा फटका शेतीला बसण्याची शक्यता अधिक आहे. रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी यांसारख्या पिकांवर वाढत्या तापमानाचा परिणाम होऊ शकतो. हवामानातील अनिश्चितता वाढल्यामुळे शेतकऱ्यांचे नियोजनही विस्कळीत होत आहे. जागतिक पातळीवर देखील परिस्थिती चिंताजनक आहे. वाढते औद्योगिकीकरण, जीवाश्म इंधनांचा प्रचंड वापर, जंगलतोड आणि प्रदूषण यामुळे पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम आता जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात जाणवू लागला आहे. जगावर युद्धाचे ढग दाटत असताना त्याचे दुष्परिणाम पर्यावरणावरही होऊ शकतात.

मात्र या सर्व घटनांना केवळ निसर्गाचा लहरीपणा म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. यामागे मानवी निष्काळजीपणा आणि बेफिकीर विकास धोरणे मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत. निसर्गाला गृहीत धरून केलेले अतिरेकी हस्तक्षेप आता मानवजातीवरच उलटताना दिसत आहेत. आज परिस्थिती अशी आहे की, हवामानशास्त्र विभागाचे अंदाजही अनेकदा चुकताना दिसतात. कारण निसर्गाची लयच बदलत चालली आहे. कधी अचानक पावसाचा शिडकावा होतो, तर कधी उन्हाची तीव्रता अचानक वाढते. या अनिश्चिततेमुळे नागरिकांसह प्रशासनालाही सतर्क राहावे लागत आहे. थंडी न झोंबताच निघून गेली आणि आता उन्हाचा तडाखा जाणवू लागला आहे. काही दिवसांत अवकाळी पावसाची शक्यता देखील वर्तवली जात आहे. त्यामुळे येणारे दिवस हवामानाच्या दृष्टीने अधिक अनिश्चित ठरण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी ओळखणे अत्यंत आवश्यक आहे. वृक्षारोपण, पाणी संवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि शाश्वत विकास यांसारख्या उपायांवर भर देणे काळाची गरज बनली आहे. अन्यथा भविष्यातील पिढ्यांना अधिक गंभीर हवामान संकटाचा सामना करावा लागू शकतो.

परिस्थिती कशीही असली तरी एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे, निसर्गाचे संकेत आपण वेळीच ओळखले पाहिजेत. कारण ऋतुचक्राचा समतोल बिघडणे म्हणजे केवळ हवामानातील बदल नाही, तर संपूर्ण जीवनपद्धतीला दिलेला इशाराच आहे. त्यामुळे 'आला उन्हाळा, तब्येत संभाळा' या उक्तीप्रमाणे स्वतःची काळजी घेत पर्यावरण जपण्याची जबाबदारीही आपण स्वीकारली पाहिजे.



बोडखे विधाते जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांची कन्या व प्राचार्य हरीदास विधाते यांचे चिरंजीव डॉ सत्यजीत व डॉ शिवानी यांच्या विवाह सोहळ्यास उपस्थित राहुन वधु वरांना शुभेच्छा देताना शिक्षण महर्षी माजी आमदार भीमराव धोंडे साहेब,माजी आमदार साहेबराव दरेकर नाना,माजी आ बाळासाहेब आजबे काका, रयत शिक्षण संस्थेचे कुलगुरू सातारा म्हस्के,जेष्ठ नेते देविदास आबा धस,महीबुब शेख, सुभाष राऊत, माजी जिल्हा अधिकारी सुनिल चव्हाण.( छाया शरद रेडेकर)

## दारू सोड म्हणणाऱ्या पत्नीला 'उत्तर' देण्यासाठी थेट पेट्रोलचा कॅन; जावयाने सासरच्या घराला लावली आग

बीड । प्रतिनिधी

**घरगुती वाद कधी कधी इतका टोकाला जातो की त्यात शहाणपणाची राख होते आणि संतापाची आग पेटते. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील पिंपळा धायगुडा येथे अशीच एक धक्कादायक आणि तितकीच व्यंगात्मक म्हणावी अशी घटना घडली आहे. पत्नी नांदायला येत नाही म्हणून संतापलेल्या जावयाने थेट सासऱ्याच्या घरालाच पेट्रोल टाकून आग लावल्याची घटना घडली असून परिसरात खळबळ उडाली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राहुल दत्तोपंत जगताप याला दारूचे अतोनात व्यसन असल्याने त्याच्या पत्नी सुलोचना राहुल जगताप या त्रस्त झाल्या होत्या. रोजच्या भांडणांमुळे आणि पतीच्या दारूच्या सवयीला कंटाळून त्या मागील आठ दिवसांपासून माहेरी पिंपळा धायगुडा येथे राहत होत्या. दरम्यान, "घर सांभाळायचं असेल तर परत ये" या भावनेने नव्हे तर "माझं ऐकायलाच हवं" या हट्टाने पतीने थेट सासरवाडी गाठली. तिथे पोहोचताच त्याने पत्नीला नांदायला येण्याची मागणी केली. मात्र पत्नीने स्पष्ट शब्दांत अट घातली "दारू पिणे बंद करा, मगच मी नांदायला येईल." ही अट ऐकून जावयाच्या संयमाची बाटली तर फुटलीच, पण त्याच्या हातात असलेला पेट्रोलचा कॅनही कामाला आला. संतापाच्या भरात त्याने घराच्या दरवाजावर आणि खिडकीतून आत पेट्रोल ओतले आणि क्षणात घराला आग लावली. आग लागल्याने घरातील गृहपयोगी साहित्य जळून खाक झाले. मात्र सुदैवाने शेजाऱ्यांनी तत्परता दाखवत धाव घेतली आणि आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पत्नी सुलोचना राहुल जगताप यांच्या फिर्यादीवरून आरोपी राहुल दत्तोपंत जगताप याच्याविरुद्ध अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

## बाळराजे पवारांच्या वतीने आयोजित दावत ए इफ्तार कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद




गेवराई । वार्ताहर

भाजपाचे नेते बाळराजे पवार यांच्या परिवाराच्या वतीने रविवार ता. ८ मार्च रोजी भगवती टॉकिज परिसरात आयोजित आलेल्या, दावत ए इफ्तार कार्यक्रमास मुस्लिम - हिंदू बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गेवराई चे पाटील बाळराजे पवार यांच्या परिवाराच्या वतीने दरवर्षी इफ्तार ए दावत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. रविवार ता. ८ मार्च २०२६ रोजी शहरात भगवती चित्रपट गृहाच्या परिसरात मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, पवार परिवाराच्या वतीने बाळराजे पवार , शिवराज पवार यांच्यासह ॲड. राजेंद्र राक्षसभुवनकर, ॲड. भगवान घुंबार्डे, जगदीश पवार, शोयब आत्तार, नगरसेवक बद्दुशेठ, शहेदाद भाई, शफी आत्तार, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी उपाध्यक्ष दादासाहेब गिरी, भरत गायकवाड, युसूफ भाई, युनुस जमादार, माऊली वादे, विठ्ठल मोटे, कृष्णा पाटोळे, नोमान फारोखी, याहयां पठाण, फिरोज अहमद, करण जाधव, रामनाथ दाभाडे, ब्रम्हदेव धुरंधरे, बेदरे शिनुभाऊ, बाळासाहेब सानप, राजाभाऊ आर्दड, नासेर भाई आत्तार, हामजा आत्तार, एजाज मेंबर, ॲड. अब्बास भाई, इनूस भाई, किशोर धोंडलकर , अशोक चव्हाण, सादेक चाचू , वाजेद चौधरी सर्व नगरसेवक, माऊली सुतार,शेख अरबाज, लुकमान खान, सय्यद इम्रान, अमीर रजा, सय्यद मुद्दशीर, आखेप काझी, सलमान आत्तार यांनी आलेल्या सर्व मुस्लिम बांधवांचे स्वागत केले.

## भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे जागतिक महिला दिनानिमित्त सन्मानित

परळी । प्रतिनिधी

**स्व. सौ. वंदना पारसेवार सामाजिक प्रतिष्ठान परळी वै. व व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री नागनाथजी पारसेवार यांच्या ६१ एकसष्ठी प्रित्यर्थ जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून परळीतील कर्तत्वान महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री ब्रिजलालजी मुंदडा व प्रमुख पाहुणे म्हणून आर्यवैश्य समाज विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आदरणीय श्री विकासरावजी डूबे, ज्यांनी हा कार्यक्रम घडवून आणला असे ६१ पूर्ती सोहळ्याची उत्सव मूर्ती आदरणीय श्री नागनाथजी पारसेवार, प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेश कौलवार, पतंजली प्रमुख सरलाभाभी उपाध्याय हे उपस्थित होते.**

सामाजिक,राजकिय कार्यात सक्रिय राहुन कार्य करत असलेल्या भाजपाच्या शहरअध्यक्ष सौ.उमामाताई समशेट्टे या अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत.दोन वेळा नगरसेविका म्हणून कार्य केलेले आहे. बीड जिल्ह्याच्या नियोजन समितीच्या सदस्या म्हणून तसेच वीरशैव महासभेच्या जिल्हा अध्यक्ष म्हणून काम करत असताना त्यांनी अनेक निराधार मुलांना शिक्षणासाठी दत्तक घेऊन त्यांच्या पायावर उभे केले आहे.महिलांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा,महिला सक्षम व्हाव्यात म्हणून अनेक कार्यशाळा घेतल्या.त्यांच्या या कार्याची स्व.सौ.वंदना नागनाथ पारसेवार सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने व मान्यवरांच्या उपस्थितीत जागतिक महिला दिनानिमित्त दि.८ मार्च रोजी सन्मान करण्यात आला. यावेळी भाजपचा शहराध्यक्ष सौ .उमाताई समशेट्टी यांनी स्व.वंदनाताई यांच्या कार्याची आठवण करून दिली. तसेच श्री नागनाथजी पारसेवार यांचा विविध संस्थांच्या वतीने ६१ वा वाढदिवस उत्साहाने साजरा करण्यात आला. पंचम ज्योतिर्लिंग महाप्रभू वैद्यनाथ नगरी श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे येणाऱ्या भाविकांना त्यांच्या प्रवासाच्या सोयीसाठी रेल्वेची वेळ समजण्यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने रेल्वे वेळापत्रकाचे व्यास पिठावरील मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. रेल्वे वेळापत्रक गणपती मंदिराच्या भिंतीवर लावण्यात आले. यावेळी परळी नगरीच्या नगराध्यक्ष सौ पद्मश्री धर्माधिकारी, सौ. सविता देवशटवार यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास जिजामाता गार्डन सदस्य वैद्यनाथ बँकेचे माजी चेअरमन विकासराव डुबे, अभयकुमार ठक्कर, चैनसुख जाजू, सुभाष तोतला, बंडूशेठ गरुड, रेपे साहेब, गुलाबराव शेटे, सोळंके सर, काकांनी सर, चंद्रकांत मुंडे, आंबेकर साहेब, वंदना प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेश कौलवार, लक्ष्मीकांत चौलवार, विनोद कौलवार, प्रकाश चिद्रेवार, विवेक पारसेवार, सुनील गडम, सरला उपाध्याय, अर्चना रुद्रावार, छाया बुरांडे, सुजाता गडम, शारदा धुमाळ, नंदा पारसेवार, शालिनी बोधे, आधी उपस्थित होते.



## मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने प्रा.बबनराव आंधळे सन्मानित

बीड । प्रतिनिधी

मातृभूमी प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना राज्यस्तरीय रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार २०२६ हा पुरस्कार सामाजिक कार्यांमध्ये सतत २५ वर्षापासून स्वतःला झोकून देऊन काम करणारे राजकीय, सामाजिक शैक्षणिक, सहकार क्षेत्रात सक्रिय सहभाग असणारे बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक तथा संत तुकाराम प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक व ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अरुणा असफअली शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन, सावता नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांना लोकनेत्या शिक्षण महर्षी प्रा. सुशीलाताई मोराळे यांच्या हस्ते समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी हरिभक्त परायण मोहन महाराज खरमाटे,राज्य ऊसतोड कामगार नेते गहिनीनाथ थोरे ,इंजिनिअर उत्तमराव मिसाळ ,मोहनराव शिरसाट, प्रा. आर. टी. गर्जे, डॉ.संजय तांदळे ,प्राचार्य बाळासाहेब नागरगोजे, यांच्यासह असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत दि. १ मार्च २०२६ रविवार रोजी श्री संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान ओबीसी चळवळ असो राजकीय असो शैक्षणिक असो प्रत्येक चळवळीमध्ये सतत सहभागी असणारे गेल्या २५ वर्षापासून अविरत कार्य करणारे प्रा. बबनराव आंधळे यांनी समाजामध्ये गेली २५ वर्ष बानेगाव ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत सदस्यत्व भूषवले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी जाहीर केलेला उपक्रम म्हणजे बाणेगाव ग्रामपंचायत मध्ये मुलीच्या जन्माचे स्वागत, तिच्या नावावर १०,०००/- दहा हजार रुपयाची करण्याचा निर्णय प्रा. बबनराव आंधळे यांनी घेतलेला आहे. या व अशा अनेक उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आलेला आहे.ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी उद्बोधन शिबिर, रक्तदान शिबिर, शेतकरी कार्यशाळा, नेत्रदान शिबिर अशा वेगवेगळ्या उपक्रमांमधून सतत अग्रेसर असणारे प्राध्यापक बबनराव आंधळे यांना मातृभूमी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातून मित्र मंडळ, सामाजिक कार्यकर्ते अभिनंदन करत आहेत. त्यांना मिळालेला समाज रत्न पुरस्कार हा गौरवास्पद आहे या कार्यक्रमास मान्यवरासह बहुसंख्येने समाज बांधव उपस्थित होते.



बीड येथे वंजारी समाज वधू वर सूचक मेळाव्यात पुरस्कार वितरण करण्यात आले. बीड जिल्ह्यात

## पान १ वरून...

### कर्जमाफी जाहीर;

आहे. आधी अस्मानी संकटाने आणि त्यानंतर सुलतानी अडचणींनी कोलमडलेल्या शेतकऱ्यांना या योजनेतूनही न्याय मिळेल का, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, जून ते ऑगस्ट २०२५ दरम्यान कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफी लागू होईल का, याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. अन्यथा पूरग्रस्त आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या तोंडाला पुन्हा पाने पुसली जातील, असा आरोप होत आहे.

------------

### युद्धग्रस्त भागांत अडकलेल्या भारतीयांसाठी एअर

एअर इंडियाची युरोप आणि उत्तर अमेरिकेला जाणारी विमाने सुरक्षित पर्यायी मार्गांचा वापर करत असून, ही सेवा पूर्णपणे सुरळीत सुरू असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. एअर इंडिया दिल्ली आणि मुंबई ते दुबई दरम्यान अतिरिक्त नॉन-शेड्युल्ड विमाने चालवणार आहे. एअर इंडिया एक्सप्रेस भारत आणि युएईच्या शहरांदरम्यान (अबू धाबी, दुबई, रास अल खैमाह आणि शारजाह) ३० अतिरिक्त विमाने चालवेल. ८ मार्चपासून युरोपमधील प्रमुख ठिकाणांशी पुन्हा संपर्क जोडण्याचे नियोजन केले असून, मध्य-पूर्वेतील ८ शहरांसाठी आपली विमान सेवा सुरू ठेवणार असल्याचे इंडिगो कंपनीने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. इंडिगोने जाहीर केले आहे की, त्यांनी युरोपसाठी आपली विमान सेवा पुन्हा सुरू केली असून अमेरिका-इस्रायल-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पश्चिम आशियातील आठ शहरांमधून कामकाज सुरू आहे.

------------

### व्हीएसआर कंपनीच्या मालकाच्या

नेते उपस्थित होते. ते कोणत्या पक्षाचे होते हे तुम्हाला माहीतच असेल ते आपण लोकांना सांगावे, असे आवाहन रोहित पवार यांनी केले आहे. दरम्यान, तुम्ही स्वार्थी आहात की अजितदादा प्रेमी आहात, हे महाराष्ट्राला दाखवून द्या, पत्रकार परिषद घेऊन याबाबत स्पष्टीकरण द्याल, ही अपेक्षा आहे, असे रोहित पवार यांनी लिहिलेल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, 'अजित पवार यांच्या विमान दुर्घटना प्रकरणाची चौकशी वेगवेगळ्या पातळ्यांवर सुरू आहे. आता प्राथमिक अहवाल आला आहे. तो काही संपूर्ण अहवाल नाही. अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही. अनेक एजन्सी तपास करीत आहेत. त्यांचा तपास पूर्ण होऊन अंतिम अहवाल आल्यानंतर यावर बोलू शकतो. सध्या यावर बोलणे उचित होणार नाही, असे म्हटले.

------------

### महाराष्ट्र नवनिर्माण

सकाळी रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून स्वतःपासून सदस्य नोंदणीची सुरुवात करणार असल्याचे त्यांनी सांगितले. रायगड हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या वास्तव्याचा तसेच शिवराज्याभिषेकाचा साक्षीदार आहे. त्यामुळे अशा पवित्र ठिकाणी जाऊन सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात करण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांना उद्देशून सांगितले की, सदस्य नोंदणी ही केवळ महाराष्ट्र सैनिकांपुरती मर्यादित नसून महाराष्ट्राला आकार देण्याची इच्छा असलेल्या आणि सध्याच्या परिस्थितीबद्दल असंतोष असलेल्या सर्वांना या अभियानाशी जोडून घ्यावे. नव्याने पक्षाशी जोडले जाणारे सर्व जण महाराष्ट्राचे पाईक आहेत, याची जाणीव स्वतः ठेवावी आणि लोकांनाही करून द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

----------

### पुण्यातील सिंहगड कॉलेजच्या

यांच्या पत्नी घरी परतल्या असता त्यांना ही बाब लक्षात आली. त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा केल्यानंतर मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. प्राथमिक तपासात घटनास्थळी सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये कामाच्या ताणामुळे आत्महत्येचा निर्णय घेतल्याचा उल्लेख असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, आत्महत्येमागील नेमके कारण हेच आहे की आणखी काही कारणे आहेत, याबाबत पोलिस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, काही दिवसांपूर्वी सिंहगड डेंटल कॉलेजवर शैक्षणिक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली होती. विद्यापीठ अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्याचा आरोप महाविद्यालयावर ठेवण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर विभागप्रमुखांच्या सुसाईड नोटमध्ये कामाच्या ताणाचा उल्लेख आढळल्यामुळे विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून पुढील तपासानंतरच आत्महत्येमागील नेमकी कारणे स्पष्ट होणार आहेत.

----------

### अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा

परराष्ट्र धोरणावर आणि आर्थिक स्थितीवर होणाऱ्या परिणामांबाबत विरोधक सरकारकडून स्पष्टीकरण मागू शकतात. याशिवाय लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात विरोधकांनी आणलेला अविश्वास प्रस्ताव हा देखील अधिवेशनात चर्चेचा केंद्रबिंदू ठरू शकतो. संसदेच्या कामकाजाच्या पद्धतीबाबत नाराजी व्यक्त करत विरोधी पक्षांनी हा प्रस्ताव आणला आहे. त्यामुळे अधिवेशनाच्या सुरुवातीपासूनच सभागृहात गदारोळ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेत असलेल्या 'एपस्टीन फाईल्स' या मुद्द्यावरूनही विरोधक सरकारला लक्ष्य करू शकतात. या प्रकरणाचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर आणि भारताशी संबंधित संभाव्य दुव्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. याचबरोबर विरोधी पक्षांच्या निलंबित खासदारांचे निलंबन मागे घेतले जाणार का, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सरकार आणि विरोधकांमध्ये याबाबत काही तोडगा निघतो का, हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

------------

### गॅस सिलिंडर काटसकरीने वापरावे

बुकिंग करण्याचा प्रयत्न केल्यास ते स्वीकारले जाणार नाही. उलट कंपनीकडून २५ दिवसांनंतर बुकिंग करण्याचा मेसेज येणार आहे. त्यामुळे सध्या उपलब्ध असलेला गॅस सिलिंडर २५ दिवस काटकसरीने वापरावा लागणार आहे. कंपन्यांकडून घरगुती गॅस सिलिंडर उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात असून कमर्शिअल (व्यावसायिक) गॅस सिलिंडरचा पुरवठा सध्या कमी होण्याची शक्यता आहे. गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी हा निर्णय घेतला आहे. साधारणपणे ४ ते ५ सदस्यांच्या कुटुंबासाठी एक गॅस सिलिंडर सुमारे ३० दिवस वापरात येतो. काही जण पहिला सिलिंडर वापरात असतानाच दुसरा सिलिंडर बुक करतात. मात्र आता हा पर्याय बंद करण्यात आला आहे. भारत गॅस आणि हिंदुस्थान गॅस कंपनीने २५ दिवसांचा, तर इंडियन ऑइल कंपनीने ३० दिवसांचा कालावधी निश्चित केला आहे.

----------

### पुन्हा विश्वविजेता..

याचा पाटला करतांना न्यूझीलंड संघ १३४ धावावर ६ गड्यांच्या मोबद्दल्यात १५ षटके पर्यंत पोहचला होता. ५ षटकात अनखी एवड्याव धावा करायच्या असल्याने न्यूझीलड संघाची दमछाक झाल्याचे दिसले भारताने पुन्हा एकदा विश्वचषकावर आपले नाव कोरले ही केवळ घोषणाच बाकी आहे रात्री १०.३० पर्यंत न्युझीलंड ची धाव संख्या १३७ वर सहा बाद अशी झाली होती. २०२६ च्या टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामना अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात खेळला जात आहे. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाच्या सलामीवीरांनी फक्त ५० धावांची भागीदारी करून विश्वविक्रम रचला. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना २५५ धावांचा डोंगर उभारला आहे. भारतीय फलंदाजांनी पाकिस्तानचा विक्रम मोडून टाकला. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या संघाच्या सलामीवीर जोडीने अंतिम सामन्यात ५० धावांची भागीदारी केली आहे, ज्यामुळे पाकिस्तानचा विक्रम मोडला आहे. यापूर्वी, अंतिम सामन्यात कोणत्याही संघासाठी सर्वाधिक सलामीवीर भागीदारी ४८ धावांची होती. ही भागीदारी २००९ च्या लॉर्ड्स टी-२० विश्वचषकात श्रीलंकेविरुद्ध पाकिस्तानकडून कामरान अकमल आणि शाहझैब हसनने केली होती. भारतीय सलामीवीरांनी पहिल्या विकेटसाठी ४३ चेंडूत ९८ धावांची भागीदारी केली होती. संपूर्ण स्पर्धेत फ्लॉप असलेल्या अभिषेक शर्माने अर्धशतकीय खेळी खेळली. अभिषेक अर्धशतक करुन बाद झाला. टी-२० विश्वचषकात संपूर्ण अपयशी ठरलेल्या अभिषेक शर्माने महत्त्वाच्या अंतिम सामन्यात अर्धशतक झळकावले. तो स्पर्धेतील पहिल्या तीन सामन्यात धावा न करता परतला. त्यानंतर त्याने १५, ५५, १० आणि ९ धावा केल्या. संजू सॅमसनलाही या सामन्यात शतक पूर्ण करता आले नाही. संजू न्यूझीलंडविरुद्ध ८९ धावांवर बाद झाला. भारताने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात सर्वाधिक धावसंख्या नोंदवली. त्यांनी २० षटकांत ५ बाद २५५ धावा केल्या, जी टी-२० विश्वचषकात एकूण तिसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. न्यूझीलंडला आता सामना जिंकण्यासाठी २५६ धावांची आवश्यकता आहे. संजू सॅमसनच्या विकेटनंतर भारतीय फलंदाजांची एकामागोमाग विकेट पडल्या. २०२६ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात, भारताला एकाच षटकात तीन धक्के पत्करावे लागले. जिमी नीशमने भारतीय डावातील १६ वे षटक टाकले. त्याने षटकाच्या पहिल्या, पाचव्या आणि सहाव्या चेंडूवर सॅमसन, इशान आणि सूर्याला बाद केले. यानंतर शिवम दुबेने ८ चेंडूत २६ धावा केल्या.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात

### जिल्ह्यात शंभर टक्के जन्म मृत्यू नोंदणी होण्याच्या दृष्टिकोनातून काम करा -जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील जन्म-मृत्यू घटनांची १०० टक्के नोंदणी व्हावी आणि नागरिकांमध्ये याबाबत जनजागृती वाढवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले. जन्म-मृत्यू नोंदणीची अंमलबजावणी व नियंत्रणाबाबत आढावा घेण्यासाठी आज दि. ५ मार्च रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समितीची बैठक घेण्यात आली.

बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), सर्व तालुक्यांचे गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, आयएमएचे अध्यक्ष तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी सर्व निबंधकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात घडलेल्या जन्म-मृत्यू घटनांची नोंद कायद्यातील तरतुदीनुसार २१ दिवसांच्या आत करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. तसेच गावपातळीवर आणि तालुका स्तरावर विविध माध्यमांतून नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या.जन्म-मृत्यू नोंदणीचे महत्त्व, प्रमाणपत्रांचा उपयोग व त्याचे फायदे ग्रामसभांमधून नागरिकांना समजावून सांगावेत, जेणेकरून नागरिक वेळेत नोंदणी करतील आणि उशिरा नोंदणी करण्याची वेळ येणार नाही, असेही निर्देश देण्यात आले.जिल्ह्यात जन्म-मृत्यू नोंदणीची शंभर टक्के अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या.

### प्रा.रेश्मा महेश निलंगेकर यांना डॉक्टरेट पदवी प्राप्त

बीड । प्रतिनिधी

प्रा. रेश्मा महेश निलंगेकर या सध्या पुणे येथील एस. पी.कॉलेज येथे हिंदी विषयाच्या सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी गेले तीन वर्षेत राजस्थान के हिंदी लोक साहित्य में सामाजिक तथा सांस्कृतिक जीवन : एक अध्ययनया विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे प्रो. शशिकला राय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध सादर केला. डॉ.प्रा. रेश्मा म. निलंगेकर यांना पीएच. डी. म्हणजेच डॉक्टरेट पदवी (विद्यावाचस्पती) मिळाली आहे. डॉ. प्रा. रेश्मा निलंगेकर यांनी एम.ए.हिंदी , बी.एड, सेट या परीक्षा उत्कृष्ट गुणाने उत्तीर्ण असून, हिंदी राष्ट्रभाषा पुणे येथील हिंदी विषयात पंडित आहेत. हिंदी-मराठी भाषेच्या अनुवादक म्हणून कार्य करतात. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ मार्फत होणाऱ्या हिंदी भाषाविषयक उपक्रमात गेले १४ वर्षे जपानी मुलांना हिंदी शिकविण्याचे कार्य करत आहे. त्यांनी राजस्थानी सांस्कृतिक कार्यावर आधारित स्वर्णीम राजस्थान या हिंदी भाषेतील पुस्तकाच्या सहायक संपादक म्हणून कार्य केलेले आहे. त्यांना नुकतीच डॉक्टरेट पदवी मिळाली त्याबद्दल डॉ.प्रा.रेश्मा म. निलंगेकर यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेष म्हणजे दोन मुलींचे शिक्षण, कुटुंब, संसार, उत्तमप्रकारे सांभाळून, हे यश मिळविले आहे. परिश्रम, जिद्द चिकाटी, कष्ट आणि अभ्यासुवृत्ती याचे हे प्रतिफळ आहे असे त्या मानतात. बीड येथील श्री वासुदेव निलंगेकर यांच्या डॉ. प्रा.रेश्मा म.निलंगेकर या स्नुषा आहेत.



# जगाला युद्धाची नाही तर बुध्दाची गरज - पुज्य भिक्खू करूणानंद महाथेरो

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा - क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी बाराव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या धम्म परिषदेचे उद्घाटन पुज्य भिक्खू करूणानंद महाथेरो (संचालक, द ग्रेट हॅपिनेस चॅनल) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुज्य भिक्खू धम्मशील (हिंगोली, बीड) आणि पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली होती.

मागील ११ वर्षांपासून बौद्ध धम्म उपासकांसाठी नांवारूपास आलेले सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर (ता.परळी) येथे शनिवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे बाराव्या बौद्ध धम्म परिषदेची सुरूवात पंचरंगी धम्म ध्वजारोहणाने करण्यात आली. या परिषदेस भिक्खू करूणानंद महाथेरो, पु.भिक्खू धम्मशील, पु.भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांचे अनमोल धम्म मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रवचनातून समाजात धम्म, समता, बंधुता आणि करूणेचा संदेश देण्यात आला. यावेळी धम्म परिषदेचे कार्यवाह ऍड.अनंतराव जगतकर, ले.कर्नल डॉ.एम.एच.कांबळे (अंबाजोगाई), डॉ.राजेश इंगोले (सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ), संग्राम गित्ते (सरपंच, चांदापूर), सौ.शाहू विजय राठोड (सरपंच, वसंतनगर तांडा), आनंद तुपसमुद्रे (बौद्धाचार्य, परळी वै.), मिलिंद नरबागे (परळी वै.), आनंद वाघमारे



(समाजभूषण, पट्टीवडगाव), प्रशांत गित्ते (चांदापूर), सुरेश मिसाळ (घाटनांदूर) आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी सरोजाताई गौतम डावरे, अर्चनाताई महेंद्र रोडे, नितीन नामदेव रोडे, महादेव नागनाथ रोडे, कविताताई अनंत इंगळे, तसेच परळी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक - नगरसेविका यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी धम्म देसना देताना पुज्य भिक्खू करूणानंद महाथेरो म्हणाले की, भारत ही बुद्धभूमी आहे. सम्राट अशोक यांनी भारतासह जगात बुध्द धम्म रूजविला. तर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुध्द धम्माचे पुनरूज्जीवन केले. त्यामुळे जगाला युद्धाची नाही तर बुध्दाची, शांतीची, डॉ.बाबासाहेबांच्या विचारांची जगाला गरज आहे. धम्म आचरणाने माणूस सदाचारी बनतो. धम्मात प्रज्ञा-शील-करूणा-समता आहे. धम्मच जगाला तारू शकतो.या प्रसंगी ऍड.अनंतराव जगतकर, डॉ.राजेश इंगोले, नगरसेवक अर्चनाताई रोडे, प्रा.डॉ.प्रदीप रोडे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राजेंद्र घोडके यांनी केले. तर सुत्रसंचालन राहुल सुरवसे, सचिन रणखांबे यांनी करून उपस्थितांचे आभार जगन सरवदे यांनी मानले. धम्म परिषदेच्या ठिकाणी परळी ग्रामीण पोलीस यांचे सुरक्षा पथक उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच तालुका आरोग्य विभागाकडून आरोग्य पथक आणि परळी नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता वाहन उपलब्ध करून देण्यात आले होते. या धम्म परिषदेत महत्वपूर्ण १३ ठराव मांडण्यात येवून ते पारित करण्यात आले. हे ठराव केंद्र व राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे यावेळी जाहिर करण्यात आले. ठरावांचे वाचन प्रा.गौतम गायकवाड यांनी केले. धम्म परीषदेच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई शहरातील रमाई चौक, कबीरनगर, सिध्दार्थ नगर, भीमनगर, तसेच तालुक्यातील जवळगाव, पुस, घाटनांदूर, उजनी, पट्टीवडगाव, नागापूर, दौनापूर, मांडवा (प), डाबी सिरसाळा, चिखली, पानगाव, येल्डा, नाथ्रा, कौठळी, टोकवाडी, नंदागौळ, जिरेवाडी या गावांतून धम्म रॅली काढण्यात आली, धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै.,जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा.प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे, निलकांत हजारे, अर्जुन काळे, प्रा.बालाजी जगतकर, सचिन रणखांबे, डॉ.बबन मस्के, मनिषाताई पांडुरंग पाखरे, समाधान तरकसे, चंद्रकांत बनसोडे, सुभाष ताटे, प्रज्ञाताई इंगोले, वर्षाताई गायकवाड, मंजुश्रीताई मधुकर कांबळे, राजीव हजारे, पंकज भटकर, मिलिंद शिंदे, शाहीर गौतम सरवदे ,सुभाष वाघमारे, राज जगतकर, आकाश वेडे सुभाष चोपडे, कैलास वेडे, संतोष शिनगारे आदींनी पुढाकार घेतला होता. बारावी बौद्ध धम्म परिषद हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून तो सामाजिक जागृती, समता आणि बौद्ध धम्माच्या तत्वज्ञानाचा प्रसार करणारा प्रेरणादायी सोहळा ठरला. दरवर्षीप्रमाणेच बारावी बौद्ध धम्म परिषद ही अत्यंत भव्य आणि प्रेरणादायी स्वरूपात आयोजित करण्यात आली. संपूर्ण परिसर धम्ममय वातावरणाने नटला होता. यावेळी हजारो उपासक, उपासिका व धम्मप्रेमी नागरिक उपस्थित होते.

## महिला दिनानिमित्त क्रीडा क्षेत्रातील गुणवंत महिलांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त जिल्ह्यातील गुणवंत राष्ट्रीय खेळाडू व महिला प्रशिक्षकांचा सन्मान करण्यात आला, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर यांनी दिली.

जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे रविवार दिनांक ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त क्रीडा क्षेत्रातील गुणवंत महिलांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित प्रा. जे .पी . शेळके , तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, ज्येष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात , जिल्हा



क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर ,जिल्हा रग्बी संघटनेचे सचिव श्री नितीन येळवे सर, राष्ट्रीय रग्बी प्रशिक्षक श्री शोयब खाटीक सर, जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त क्रीडा संघटक श्री शरद अंदुरे, जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त महिला तायक्कांदो प्रशिक्षिका जया बारगजे, योग प्रशिक्षिका राधा तांबे , क्रीडा मार्गदर्शक श्री रेवन्नाथ शेलार , क्रीडा अधिकारी श्री अविनाश पाटील, क्रीडा अधिकारी श्री अनिकेत काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर सर यांनी करून या कार्यक्रमाचे महत्त्व व जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रातील प्रगती बद्दल माहिती दिली . डॉ. अविनाश बारगजे यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल सर्व महिला खेळाडू प्रशिक्षकांचे कौतुक केले. प्रा.जे पी शेळके यांनी अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना सांगितले की, महिलांना क्रीडा क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध असून मुलींनी आंतरराष्ट्रीय पातळीवर पदक जिंकण्याचे ध्येय मनाशी बाळगून बीड जिल्ह्याचे नाव लौकीक वाढवावे असे आवाहन केले. यावेळी गुणवंत क्रीडा कार्यकर्ता जिल्हा क्रीडा पुरस्कार विजेत्या तायक्कांदो प्रशिक्षिका जया बारगजे, योग प्रशिक्षिका राधिका तांबे व राष्ट्रीय पातळीवरील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तायक्कांदो खेळाची आंतरराष्ट्रीय खेळाडू नयन बारगजे , राष्ट्रीय पदक विजेती तायक्कांदो खेळाडू कार्तिकी मिसाळ , यशश्री चव्हाण , राष्ट्रीय बेसबॉल खेळाडू रत्नमाला चौरे , आकांक्षा खरब , राष्ट्रीय रग्बी खेळाडू आदिती लोंढे, कीर्ती जाधव व राधा दिवे या गुणवंत महिला खेळाडूंचा प्रातिनिधिक स्वरूपामध्ये सन्मानचिन्ह व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री ज्ञानेश्वर कोठूळे यांनी केले तर आभार प्रदर्शन क्रीडा मार्गदर्शक श्री रेवणनाथ शेलार यांनी केले.

पान ६ वरुन...

### तहसीलदारसाहेब, सत्तेपुढे शहाणपन

कार्यकर्त्या कडुन होत असून प्रशासनाने कठोर भूमिका घेणे आवश्यक असताना. महसूल व पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक या गोष्टीकडे दुर्लक्ष करताना दिसून येत आहे. बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, यांनी काढलेला आदेश दि. १४ जानेवारी २०२६ रोजीच्या कार्यारंभ आदेशानुसार सन २०२५-२६ या कालावधीसाठी पर्यावरण मान्यता प्राप्त वाळूघाटांचे ई-निविदा प्रक्रियेद्वारे वाटप करण्यात आले आहे. वाळूघाटांचा ठेका संबंधित ठेकेदारास देण्यात आला आहे. मात्र या वाळू घाटावर नियमांचे काटेकोरपणे पालन केले जात नसून अनेक प्रकारच्या गंभीर तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्यानंतर ही माजलगाव तहसीलदार यांनी या वाळू घाटांची प्रत्यक्ष पाहणी न करता व प्रत्यक्ष भेट न देता एकाही वाळू ठेक्यावर कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

प्राप्त तक्रारी नुसार व माहितीनुसार या वाळू घाटावर उत्खनन स्थळी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत नसुन, जेसीबी व पोकलेन यंत्रांचा वापर सर्रासपणे केला जात असून वाहनांमध्ये अधिकृत मजुरांऐवजी यंत्राद्वारे वाळू भरली जात आहे व क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहतूक केली जात आहे, तसेच या वाळू घाटावर जीपीएस प्रणालीचा वापर केला जात नसून शासनाने निश्चित केलेल्या वेळेपेक्षा जास्त काळ वाहतूक सुरू ठेवली जात आहे. शासनाने स्पष्ट केलेल्या नियम व सूचनांनुसार उत्खनन करण्यासाठी दिलेले वाळू ठीकाण व वाळू भरण्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असणे आवश्यक आहेत. केवळ कॅमेरे बसविणे बंधनकारक नसून त्याचा डेटा नियमितपणे दर सोमवारी संबंधित कार्यालया मध्ये सादर करणे बंधनकारक आहे. सीसीटीव्ही प्रणालीमध्ये कोणतीही चूक व ढिलाई आढळल्यास ती गंभीर स्वरूपाच्या नियमभंगाची बाब मानली जाईल, असा इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. मात्र

वाळू उत्खननासाठी जेसीबी व पोकलेन यासारख्या यंत्रांचा या ठिकाणी सर्रासपणे वापर होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे होत असून स्थानिक प्रशासन माजलगाव तहसीलदार याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. या गंभीर बाबीची दखल घेतली जात नसल्याने सुजान नागरिकांमध्ये संतपाची लाट निर्माण झाली आहे. या वाळू घाटावर नियमबाह्य यांत्रिकी उत्खनन होत असून महसूल शासनाने नियमानुसार संबंधित यंत्रसामग्री तात्काळ जप्त करायला पाहिजे व येथील जबाबदार व्यक्तीवर देखील दंडात्मक कारवाई व्हायला पाहिजे, शासनाने दिलेल्या नियम व अटींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींची हाय काय न करता त्यांच्यावर कठोर कारवाई केली जायला पाहिजे, परंतु तालुक्यामध्ये कुंपणच शेत खात असल्याची चर्चा होत आहे. परंतु या व्यवसायामध्ये जो तो स्वतःची खिसे भरण्यातच मशगुल आहे. वाहनांमध्ये वाळू भरताना कामगार आयुक्तांच्या ओळखपत्रधारक मजुरांचाच वापर करणे बंधनकारक असताना थेट यंत्राद्वारे वाळू भरण्याचे प्रकार होत असल्याचे समोर येत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असून संबंधित व स्थानिक महसूल प्रशासनाने तातडीने या प्रश्नावर लक्ष घालावे व अधिकृत ओळखपत्र नसलेल्या मजुरांचा वापर न आढळल्यास कारवाई करण्यात यायला हवी. परंतु असे न होता ओव्हरलोडिंग वाहने महसूल व पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिचून राजरोसपणे वाहतूक करीत आहेत. वाहनांच्या क्षमतेपेक्षा जास्त वाळु वाहतूक केली जात असून या वाहनावर गौण खनिज कायद्यानुसार कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यायला पाहिजे. परंतु या गोष्टीकडे संबंधित अधिकारी व कर्मचारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्यामुळे ओव्हरलोडिंग वाहने राजरोसपणे भरधाव वेगात धावत आहेत यामुळे अपघातांच्या संख्येमध्ये वाढ होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या ओव्हर लोडिंग वाहनांमुळे रस्ते खचत आहेत व त्यांना भेगा पडत आहेत यामुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. यामुळे गोदाकाठावरील ग्रामीण भागातील जीवन वाहिनी असणाऱ्या रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत चालले आहे. वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस प्रणाली बसविणे अनिवार्य असताना अनेक वाहनांमध्ये जीपीएस नसल्याचे निदर्शनास येत आहे.

### पॅरामेडिकल कोर्सच्या

पॅरामेडिकल कोर्सेसला प्रवेस घेते वेळी एस.ई.बी. सी.प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ओबीसीच्या विद्यार्थ्या प्रमाणे फिस मध्ये सवलत देऊन प्रवेस झाले.मात्र शिष्यवृत्तीच्या महाडीबीटी वर ऑनलाइन फॉर्म भरताना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कॉलेज व पॅरामेडिकलच्या सर्व कोर्सचे ऑप्शन येत आहे.मात्र एस ई बी सी च्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी वर कॉलेज व कोर्सचे ऑप्शन येत नाही.ही योजना एस ई बी सी.च्या विद्यार्थ्यांना लागू नाही आसे दाखवत आहे.शासनाने ओबीसी च्या सर्व योजना एस ई बी सी.च्या विद्यार्थ्यांना लागू केलेल्या आसताना मात्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पॅरामेडिकल कोर्सला कोणतीही योजना लागू नाही.मेडिकलच्या इतर सर्व कोर्सला विविध योजना लागू आहेत.महाराष्ट्रात ६४२ हून आधिक आभ्यासक्रमांना मुलींना मोफत शिक्षण मिळत आहे.त्यात पॅरामेडिकल कोर्स का नाहीत. ? मात्र पॅरामेडिकल कोर्सला कोणतीही योजना का लागू नाही ? या मुळे मराठा समाजाती शेकडो मुला / मुलींना याचा आर्थिक फटका बसत आहे.ही बाब आपण सरकारच्या निदर्शनास आणून द्यावी व मराठा समाजाती एस ई बी सी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना न्याय देऊन पॅरामेडिकल कोर्सेसला राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करावी.तसेच पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना लागू करवी अशी मागणी पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांनी आ.प्रकाश सोळंके यांच्याकडे केल्यानंतर आ.सोळंकेंनी हा प्रश्न तातडीने औचित्याचा मुद्द्यावर अधिवेशनात सभागृहात मांडुन हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन यावेळी पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांना दिले.

### हायवेवर दरोडा टाकणाऱ्या टोळीस

कॉंवत यांनी पोस्टे गेवराई गुरन. ७१४/२०२५ कलम ३०९(६), ३१०(२), ३२४(४) भारतीय न्याय संहिता या गुन्ह्यात नवीन भारतीय न्याय संहिता या कायदयाप्रमाणे मिनी लावण्याचे अधिकार पोलीस अधीक्षकांना प्राप्त झाल्याने कलम १११ संघटीक गुन्हेगारी (मिनी मोक्का) लावण्याची परवानगी पोलीस निरीक्षक गेवराई यांना दिली आहे.सदरची कामगिरी श्री नवनीत कॉंवत पोलीस अधीक्षक बीड, अप्पर पोलीस अधीक्षक बीड श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनिल कटके, पो.नि.श्री. शिवाजी बंटेवाड, स्थागुशा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. किशोर पवार, सपोनि अण्णासाहेब पवार, पोअ कल्याण राठोड, काबंळे पो.स्टे गेवराई यांच्यासह स्थागुशाचे सपोउपनि अभिमन्यु औताडे पोअ/ बिबीशन चव्हाण, शेख अलिम अशांनी मिळुन केली आहे. भविष्यातही अशा प्रकारच्या गुन्हेगाराच्या टोळ्यावर मोक्का लावण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री नवनीत कॉंवत यांनी दिले आहेत.

### खंडेश्वरी मंदिर रस्त्यावरील

सर्वत्र कचरा उचलण्यासाठी घंटागाड्या असल्या तरी या घंटागाला वेळेवर येत नाहीत. कधी कधी दोन दोन दिवस येत नाहीत. त्यामुळे नागरिक नाईलाजाने नको तिथे कचरा टाकतात. हा कचरा कचराकुंडीत पडावा यासाठी वार्डामध्ये ज्या ठिकाणी जागा असेल त्या ठिकाणी एक मोठी कचराकुंडी ठेवावी अशी मागणी नागरिक करत आहेत.

## मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने प्राध्यापक बबनराव आंधळे सन्मानित

बीड । प्रतिनिधी

मातृभूमी प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार २०२६ हा पुरस्कार सामाजिक कार्यामध्ये सतत २५ वर्षापासून स्वतःला झोकून देऊन काम करणारे राजकीय, सामाजिक शैक्षणिक सहकार क्षेत्रात सक्रिय सहभाग असणारे बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक तथा संत तुकाराम प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक व ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अरुणा असफअली शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन सावता नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांना लोकनेत्या शिक्षण महर्षी प्राध्यापक सुशीलाताई मोराळे यांच्या



हस्ते समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी हरिभक्त परायण मोहन महाराज खरमाटे राज्य ऊसतोड कामगार नेते गहिनीनाथ थोरे इंजिनिअर उत्तमराव मिसाळ मोहनराव शिरसाट साहेब प्राध्यापक आर. टी. गर्जे डॉ.संजय तांदळे प्राचार्य नागरगोजे सर यांच्यासह असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत दिनांक १ मार्च रोजी श्री संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान बीड येथे वंजारी समाज वधू वर सूचक मेळाव्यात पुरस्कार वितरण करण्यात आले बीड जिल्ह्यात ओबीसी चळवळ असो राजकीय असो शैक्षणिक असो प्रत्येक चळवळीमध्ये सतत सहभागी असणारे गेल्या २५ वर्षापासून अविरत कार्य करणारे प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी समाजामध्ये गेली २५ वर्ष बानेगाव ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत सदस्यत्व भूषवले आहे त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी जाहीर केलेला उपक्रम म्हणजे बाणेगाव ग्रामपंचायत मध्ये मुलीच्या जन्माचे स्वागत तिच्या नावावर १०,०००/ - दहा हजार रुपयाची ऋऊ षळु वर्शोळिं करून करण्याचा निर्णय प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी घेतलेला आहे या व अशा अनेक उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आलेला आहे ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी उद्बोधन शिबिर, रक्तदान शिबिर शेतकरी कार्यशाळा, नेत्रदान शिबिर अशा वेगवेगळ्या उपक्रमांमधून सतत अग्रेसर असणारे प्राध्यापक बबनराव आंधळे यांना मातृभूमी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातून मित्र मंडळ, सामाजिक कार्यकर्ते अभिनंदन करत आहेत त्यांना मिळालेला समाज रत्न पुरस्कार हा गौरवास्पद आहे या कार्यक्रमास मान्यवरासह बहुसंख्येने समाज बांधव उपस्थित होते.

## शिफा आतार हिचा पहिला रोजा उत्साह पूर्वक संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पात्रुड येथील पत्रकार नईम आतार यांची कन्या शिफा आतार हिने शनिवार.दि.०७ मार्च शनिवार रोजी पवित्र रमजान महिन्यात वयाच्या ९ व्या वर्षी आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने पूर्ण केला. बालवयामध्येच धार्मिक कर्तव्याची जाणीव ठेवून तिने हा रोजा पूर्ण केल्याने या बालिकेच्या कुटुंबीय व नातेवाईकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे.शिफा नईम आतार ही बालिका इयत्ता ४ चोथी. वर्गात शिक्षण घेत असून तिने एवढ्या लहान वयामध्ये धार्मिक संस्कार जोपासत आपला पहिला रोजा पूर्ण केल्याने तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तसेच नातेवाईक व मित्रपरिवाराकडून तिचे अभिनंदन केले जात आहे. या मालिकेने एवढ्या लहान वयामध्ये आपल्या आयुष्यातील पूर्ण केलेला पहिला रोजा हा आदर्श लहान बालकांसाठी खरोखरच प्रेरणादायी ठरणारा आहे.



# महिलांचा शंभर टक्के सहभाग ही बीडसाठी अभिमानाची बाब -जिल्हाधिकारी

**बीडमध्ये 'महिला मॅरेथॉन' उत्साहात; जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाचा उपक्रम**

बीड । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'महिला मॅरेथॉन' स्पर्धा रविवार दि.८ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत शालेय विद्यार्थिनींपासून ते ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्व वयोगटातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्यजागृती आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला.

महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिला मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जात पडताळणी विभागाचे सहाय्यक उपायुक्त उमेश सोनवणे तसेच तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा.प्रदीप रोडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महिला दिनानिमित्त मॅरेथॉनसारख्या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल





आयोजकांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, विविध ठिकाणी आयोजित मॅरेथॉनमध्ये महिलांचा सहभाग तुलनेने कमी असतो, मात्र बीडमध्ये शंभर टक्के महिलांचा सहभाग दिसून येणे ही अभिमानाची बाब आहे. तसेच त्यांनी बीड जिल्ह्यातील बालविवाह आणि मुलींच्या शिक्षणातील गळतीच्या प्रश्नावरही प्रकाश टाकत समाजाने याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.अशा स्पर्धांमधून महिलांचा आत्मविश्वास वाढतो आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो, असे त्यांनी नमूद केले. सकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मॅरेथॉनला सुरुवात झाली. नगर रोड मार्गे पुन्हा सामाजिक न्याय भवन असा सुमारे ७ कि.मी.चा मार्ग स्पर्धकांनी उत्साहाने पार केला. १० ते १८ वर्षे आणि १८ वर्षांवरील अशा दोन गटांत ही स्पर्धा पार पडली. दोन्ही गटांत चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली. स्पर्धेच्या शेवटी विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यामध्ये गट-अ (१० ते १८ वर्षे) या गटात कु.दिव्या राठोड हिने २९ मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला. तिला १५,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु.अमृता वायकर तर तृतीय क्रमांक कु.अक्षरा शेलार यांनी मिळवला. त्यांना अनुक्रमे १०,००० व ७,००० रुपये रोख पारितोषिकांसह सन्मानित करण्यात आले. गट-ब (१८ वर्षांवरील) या गटात कु.परिमला बाबर हिने ३२ मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक मिळवला. तिला १५,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु.ज्ञानेश्वरी गुजर, तर तृतीय क्रमांक कु.कांचन शिंदे यांनी मिळवला. त्यांनाही अनुक्रमे १०,००० व ७,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासन, योगा ग्रुप, बालाघाट ग्रुप, तसेच तुलसी शैक्षणिक समूहातील विविध युनिटचे प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल, प्रा.डी.डी.राऊत, प्रा.डी.जी निकाळजे, डॉ.सुनील जोंधळे, प्रा.प्रकाश ढोकणे, उमा जगतकर, डॉ.अश्विनी बेद्रे यांच्यासह शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. मॅरेथॉनला शहरातील नागरिक, पालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.९ मार्च २०२६
४

# शेतीतील महिलांना दुय्यम स्थान; अधिकारापासून आजही वंचित

शेती क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना आजही दुय्यम स्थान आहे. जमीन आणि इतर संसाधनांवर अधिकार नसल्याने क्षमता असूनही आर्थिक विकासापासून वंचित राहावे लागत असून, सामाजिक असुरक्षितता, कुटुंब आणि कामाच्या ठिकाणी असलेल्या हिंसाचाराला तोंड द्यावे लागत असल्याची धक्कादायक माहिती एका सर्व्हेक्षण अहवालातून समोर आली आहे. सोपेकॉम, महिला किसान अधिकार मंच (मकाम) आणि स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने महाराष्ट्रातील कोरडवाहू भागातील महिला शेतकऱ्यांची परिस्थिती आणि त्यांच्या समोरील अडचणींचा सखोल अभ्यास करण्यात आला. या अभ्यासासाठी प्रातिनिधिक स्तरावर अकोला, परभणी आणि यवतमाळ जिल्ह्यातील कोरडवाहू तालुक्यातील २२ गावांतील १३६२ महिलांशी संपर्क साधून विविध विषयांसंबंधी सर्व्हेक्षण करण्यात आले. याचप्रकारे तेलंगणा आणि पंजाब राज्यातील महिलांच्या समस्यांबाबत अभ्यास करण्यात आला. याचा सारांश 'शेतीमधील अरिष्ट आणि ग्रामीण महिलांवर होणारा हिंसाचार' या अहवालाद्वारे प्रसिद्ध करण्यात आला आहे.

सरकार महिला सक्षमीकरणाबाबत विविध घोषणा देत असलेतरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे. आजच्या (ता.८) जागतिक महिला दिनी पुन्हा एकदा नव्याने ग्रामीण महिलांची सुरक्षितता, आर्थिक विकास, आरोग्य आणि शिक्षणाच्या दृष्टीने गांभीर्यपूर्वक विचार करण्याची वेळ आली आहे. या निष्कर्षांबाबत माहिती देताना 'सोपेकॉप' संस्थेतील अभ्यासिका स्नेहा भट म्हणाल्या, की आमच्या अभ्यासानुसार आजही शेती क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना दुय्यम स्थान आहे.जमीन आणि इतर संसाधनांवर अधिकार नाही. शिक्षण, प्रशिक्षणाचा अभाव, मजुरीमध्ये तफावत, मजुरी देणाऱ्या कामाचे कमी झालेले प्रमाण तसेच घरातील विविध जबाब दारीमुळे महिलांचा शेतीमधील कामावर परिणाम दिसतो. स्वतःच्या शेतीमध्ये आवश्यक गुंतवणूक करून पीक उत्पादकता वाढवणे शक्य होत नाही. याचबरोबरीने आर्थिक सुरक्षितता, शोषण करणारी सामाजिक व्यवस्था तसेच कुटुंब, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या हिंसाचारालाही तोंड द्यावे लागत आहे. याचा आरोग्य, मानसिक स्वास्थ आणि आत्मसन्मानावर गंभीर परिणाम दिसून आला आहे. राज्यातील महिला कामगारांपैकी ८८ टक्के महिला आणि पुरुष कामगारांपैकी ६६ टक्के पुरुष शेतीमध्ये गुंतले आहेत. एकूण भूधारकांपैकी केवळ १५ टक्के भूधारक महिला आहेत. ग्रामीण भागातील एकूण बँक खात्यांपैकी ३३ टक्के खाती महिलांच्या नावावर आहेत. परंतु बँकेकडून दिल्या जाणाऱ्या एकूण कर्जापैकी सात टक्के कर्ज महिलांना दिले जाते. कोरडवाहू भागांमध्ये शेती आणि शेतमजुरीशिवाय रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत. भूमिहीन कुटुंबातील महिलांची परिस्थिती आणखी बिकट आहे.



गेल्या काही वर्षांत अकोला, परभणी आणि यवतमाळ जिल्ह्यातील कोरडवाहू भागामध्ये कापूस आणि सोयाबीन हीच एक पीक पद्धती विकसित झाली आहे. एक पीक पद्धतीचा परिणाम महिलांच्या मजुरीवर झाला आहे. एका वर्षामध्ये महिला मजुरांना केवळ १२० ते १३४ दिवस शेतीमध्ये रोजगार उपलब्ध आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे शहरी भागात स्थलांतर वाढले आहे.आर्थिक ओढाताणीच्या बरोबरीने पाठदुखी, अंगदुखी, त्वचा विकारांचे प्रमाण वाढले आहे. लहान मुलांचे शिक्षण, आरोग्यावरही परिणाम होताना दिसत आहे. आर्थिक समस्यांतून मार्ग काढण्यासाठी सावकार आणि मायक्रोफायनान्सकडून घेतलेल्या कर्जाचा बोजा फेडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षातून मानसिक ताण, नैराश्य वाढले आहे.

सरकारच्या सतत बदलत जाणाऱ्या धोरणांचा परिणाम ग्रामीण महिलांमध्ये दिसतो. पेन्शन, मातृवंदन अशा महिलांसाठी असणाऱ्या योजनांचा लाभ फार कमी महिलांना मिळाला आहे. रोजगार हमी योजनेतूनही फार कमी रोजगार महिलांना मिळतो. कामाची अनुपलब्धता,आर्थिक ओढाताण आणि कर्जाचे ओझे या समस्यांसोबत झगडताना पुरेशी सामाजिक सुरक्षा सरकारकडून मिळत नसल्याचे या सर्व्हेक्षण अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे. यंदाचे वर्ष हे जागतिक महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे होत आहे. या निमित्ताने महिला शेतकऱ्यांच्या कष्टांना योग्य किंमत आणि जमीन अधिकार मिळणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने कायदा, शासकीय योजनांना गती मिळावी. शेतीमधील जैवविविधता जपण्यामध्ये महिला शेतकऱ्यांची मोठी भूमिका आहे. हवामान बदलाच्या काळात जैवविविधता जपण्यासाठी महिलांना प्रोत्साहन मिळाल्यास अन्नधान्य सुरक्षा, पौष्टिक अन्नधान्य जातींचे संवर्धन, पीक विविधता आणि उत्पन्नवाढीला निश्चित गती मिळेल.

## बहुगुणी औषधी वनस्पती माईनमुळा



आजारासाठी अतिशय उपयुक्त वनस्पतीचे नाव आहे 'माईनमुळा'. या वनस्पतीला संस्कृत मध्ये पाषाणभेद, हिंदीत पत्थरचूर या नावाने सुद्धा ओळखतात. या वनस्पतीच्या मुळांना बाजारात चांगली मागणी असते. माईनमुळ्याचा उपयोग श्वासासंबंधी रोग, रक्तदाब व पर्यायाने येणारे हृदयरोग व कॅन्सर यासारख्या आजारांवर होतो. माईनमुळ्याची भाजी, कोशिंबीर व लोणचे यांचा आहारात वापर केल्यास, यासर्व रोगांचे त्रास कमी होण्यास मदत होऊ शकते. महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली व सातारा परिसरात या औषधी वनस्पतीची आंतरपीक म्हणून लागवड केली जाते.माईनमुळ्याची लागवड : साधारणपणे जुलै ऑगस्ट महिन्यात या वनस्पतीची लागवड केली जाते. सर्वसाधारणपणे या वनस्पतीस १० ते २५ अंश से. तापमान व ८३ ते ९५ टक्के आर्द्रता मानवते. परंतु, उष्ण हवामान व कमी प्रमाणात आर्द्रता असल्यास पाणी दिल्याने वनस्पतीची वाढ चांगली होते. लागवडीस निचरा होणारी, रेताड, गाळाच्या जमिनी चांगल्या असतात. लागवड ही खोडाच्या छाट कलमाद्वारे करतात. माईनमुळ्याच्या दोन जातीची लागवड शेतकरी करतात उग्र वासाची जात औषधीसाठी वापरली जाते, तर सौम्य वास असलेल्या जातीचे लोणचे करतात. माईनमुळ्याच्या झुडुपास फुलांचे तुरे आले की ते खुडुन टाकतात. म्हणजे मुळे चांगली वाढतात. या वनस्पतीला कीड लागत नाही. मात्र बुरशी लागु नये म्हणून झाडांवर निंबोणीच्या अर्काची फवारणी करावी लागते. लागवडीनंतर साधारणपणे १४० ते १५० दिवसांनी मुळे काढण्यास तयार होतात. एकरी ५ टन माईनमुळ्यांचे उत्पादन होऊ शकते.

माईनमुळ्याच्या झुडुपास फुलांचे तुरे आले की ते खुडून टाकतात. म्हणजे मुळे चांगली वाढतात. या वनस्पतीला कीड लागत नाही. मात्र बुरशी लागू नये म्हणून झाडांवर निंबोणीच्या अर्काची फवारणी करावी लागते. लागवड केल्यापासून साडे तीन चार महिन्यात मुळे तयार होतात. मुळे अवघी अर्धा इंच ते पाऊण इंच जाडीची असतात. चार ते सहा इंच लांबीची असतात. त्यावर बारीक बारीक मुळे आणि त्यात अडकलेली माती असते. मुळे घरी आणल्यावर, साफ करणे जिकिरीचे काम असते. माईनमुळा साधारण नोव्हेंबर,डिंसेबर मधे बाजारात मिळतो. या कालावधीत मुंबईलाही माईनमुळा मिळतो. या औषधी वनस्पतीला बाजारात ३०,००० रुपये टन भाव मिळतो. यापासून तीन ते चार महिन्यातच शेतकरी लाखो रुपयाचा फायदा मिळवू शकतात. माईनमुळ्याची रोपे पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील नागार्जुन औषधी वनस्पती गार्डन येथे विक्रीस उपलब्ध आहेत.

## महत्वाच्या रब्बी पिकांची अशी करा काढणी

रब्बी हंगामातील गहू, रब्बी मका, हरभरा, करडई ही पिके सध्या काढणीला येत आहे. त्यामुळे पिकाची अवस्था तपासून योग्य वेळी पिकांची काढणी करणे आवश्यक आहे. योग्य पद्धतीने काढणी केल्यास काढणीनंतर होणारे नुकसान टाळता येते आणि धान्याची टिकवणक्षमताही वाढते. सध्या तापमानात वाढ होत असल्यामुळे उभ्या पिकांना त्यांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर वेळेवर पाणी देणे गरजेचे आहे. विशेषतः सकाळी लवकर किंवा संध्याकाळी सिंचन केल्यास पिकांना अधिक फायदा होतो. त्यामुळे पिकांची वाढ चांगली राहते आणि उत्पादनावर सकारात्मक परिणाम होतो.

गहू : लवकर पेरणी केलेल्या गव्हामध्ये दाण्यातील ओलावा सुमारे १५ टक्के असताना काढणी करणे योग्य ठरते. पिक पूर्ण पक्व होण्याच्या साधारण २ ते ३ दिवस आधी काढणी केल्यास गव्हाचे दाणे शेतात झडण्याची शक्यता कमी होते. उशिरा पेरणी केलेल्या गहू पिकाला पेरणीनंतर ८० ते ८५ दिवस झाले असतील आणि पीक दाणे भरण्याच्या अवस्थेत असेल, तर त्या वेळी पाणी देणे आवश्यक आहे. रब्बी मका : मक्याची कणसे पिवळसर होऊन दाणे कडक झाल्यावर कणसे खुडून काढावीत. त्यानंतर ही कणसे दोन ते तीन दिवस उन्हात चांगली वाळवावीत. वाळल्यानंतर कणसाचे आवरण काढून मका सोलणी यंत्राच्या साह्याने दाणे वेगळे करावेत. दाण्यातील तुसे किंवा इतर तुकडे वेगळे करण्यासाठी उफनणी करावी. साठवण करण्यापूर्वी दाणे चांगले वाळवून त्यातील आर्द्रता सुमारे १२ टक्क्यांपर्यंत ठेवावी.

हरभरा : हरभरा पीक साधारणपणे ११० ते १२० दिवसांत तयार होते. पीक ओलसर असताना काढणी करू नये. घाटे पूर्णपणे वाळल्यानंतर काढणी करून मळणी करावी. त्यानंतर धान्याला ५ ते ६ दिवस कडक उन्हात वाळवावे. साठवण करताना हरभऱ्यात सुमारे ५ टक्के कडुलिंबाचा पाला मिसळल्यास साठवणीत कीड लागण्याची शक्यता कमी होते.

करडई : करडई पीक साधारणपणे ११५ ते १२० दिवसांत काढणीसाठी तयार होते. पिकाची पाने पूर्णपणे वाळल्यानंतर काढणी करावी. काढणी करताना दाण्यातील ओलावा १२ ते १४ टक्के असणे योग्य मानले जाते. कम्बाइन हार्वेस्टरच्या सहाय्याने काढणी केल्यास नुकसान कमी होते.

योग्य साठवण : धान्य साठवताना त्यातील ओलाव्याचे प्रमाण योग्य ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कापणी केलेल्या धान्यात साधारण ११ ते १२ टक्के ओलावा असावा. कडधान्यांमध्ये ९ टक्के, तेलबियांमध्ये ८ टक्के आणि भाजीपाला बियाण्यांमध्ये ५ ते ६ टक्के ओलावा ठेवून धान्य वाळवून साठवले, तर साठवणीत किडीचा प्रादुर्भाव कमी होतो आणि बियाण्याची गुणवत्ता टिकून राहते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५७६ : साली मेवाड शासक महाराणा प्रताप आणि मुघल शासक बादशाहा अकबर यांच्यात हल्दीघटीचे युद्ध झाले.
१६५३ : साली विश्वविख्यात जागतिक वारसा स्थळांच्या यादीत नोंदल्या गेलेली ऐतिहासिक वास्तू ताजमहल ची निर्मिती जवळपास २२ वर्षांनंतर पूर्ण झाली
१८७४ : मुंबईत प्रथम घोड्यांची ट्राम सुरु झाली.
१८७७ : पेरू देशाच्या किनारपट्टीवरील झालेल्या ८.८ तीव्रतेच्या भूकंपामुळे २५४१ लोक ठार झाले.
१९०४ : वाफेवर चालणारे सिटी ट्रुरो हे इंजिन १६० किमी / ताशी पेक्षा जास्त वेगाने धावणारे यूरोपमधील पहिले इंजिन बनले.
१९३६ : इटलीने इथिओपिया देश बळकावला.
१९५५: पश्चिम जर्मनी देशाचा नाटो मधे प्रवेश.
१९७५ : विजेवर चालणारी टंकलेखन मशीन तयार करण्यात आली
१९९९ : अटलांटा ग्रांप्री नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रुपी उन्नीकृष्णनने प्रोन गटात रौप्यपदक पटकाविले.
१९९९ : ग्वाटेमालाच्या ज्युलिओ मार्टिनेझ याने ग्रॅन्ड प्रिक्स स्पर्धेतील वीस किलोमीटर चालण्याची शर्यत १ तास १७ मिनिटे व ४६ सेकंदात पूर्ण करुन नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी गुगलने इंटरनेट प्रोग्राम एड्सेंस सादर केला.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध लावण्यासाठी आपला टोही नावाचा उपग्रह प्रक्षेपित केला.
२०१२ : अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती बराक ओबामा यांनी समलैंगिक विवाह करण्यास आपली अनुमती दिली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४० : मेवाडचा प्रसिध्द वीरपुरुष महाराणा प्रताप.
१८१४ : दादोबा पांडुरंग तर्खडकर, इंग्लिश व्याकरणकार, ग्रंथकार
१८३६ : फ्रेंच नेत्र रोग विशेषज्ञ फर्डिनेंड मोनॉयर यांचा जन्मदिन.
१८६६ : गोपाळ कृष्ण गोखले, भारतीय स्वातंत्र्यसेनानी, मराठी समाजसुधारक.
१८८६ : स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक प्रमुख नेते, शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक केशवराव मारुतराव जेधे यांचा जन्म. (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९५९ पुणे)
१८९६ : थोर स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रमुख नेता व शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक केशवराव मारुतराव जेथे यांचा जन्मदिन.
१९२८ : वसंत नीलकंठ गुप्ते, मराठी कामगार चळवळ कार्यकर्ते, लेखक.
१९३५ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी कवयित्री स्नेहमयी चौधरी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन


१३३८ : भगवद्भक्त चोखा मेळा हा मंगळवेढे येथील गावकुस बांधत असताना कोसळणार्या कुसबाखाली सापडला.
१९१७ : डॉक्टर, कवी व शास्त्रज्ञ कान्होबा रणझोडदास यांचे निधन.
१९१९ : रेव्हरंड नारायण वामन टिळक यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १८६१)
१९३१ : वर्णपटाद्वारे प्रकाशाच्या मापनासंबंधीच्या शोधासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे जर्मन–अमेरिकन पदार्थवैज्ञानिक अल्बर्ट मायकेलसन यांचे निधन. (जन्म: १९ डिसेंबर १८५२)
१९५९ : थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १८८७)
१९५९ : साली दक्षिण आफ्रिकेतील हिंदी विषयाचे प्राध्यापक व महात्मा गांधी यांचे निकटवर्तीय तसचं, राष्ट्रवादी, हिंदी आणि आर्य सामाजीक भारतीय स्वामी भवानी द्याल संन्यासी यांचे निधन.
१९८६ : एवरेस्ट शिखर सर करणारा शेरपा तेलसिंग नोर्गे यांचे निधन. (जन्म: २९ मे १९१४)
१९९५ : दिग्दर्शक अनंत माने यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १९१५)
१९९८ : पार्श्वगायक व अभिनेता, गझलचे बादशहा तलत महमूद यांचे निधन. (जन्म: २४ फेब्रुवारी १९२४ लखनौ, उत्तर प्रदेश)
१९९९ : उद्योगपती करमसीभाई जेठाभाई सोमय्या यांचे निधन.
२००४ : चेचेन्या येथे झालेल्या विस्फोटात तेथील राष्ट्रपती अखमद कादरोव यांचे निधन.
२००८ : किराणा घराण्याचे शास्त्रीय गायक पं. फिरोझ दस्तूर यांचे निधन.
२०१४ : भारतीय राजकारणी नेदुरुमल्ली जनार्दन रेड्डी यांचे निधन. (जन्म: २० फेब्रुवारी १९३५)

## बोरॉनच्या कमतरतेमुळे पपईच्या उत्पादनात होऊ शकते घट

पपई पिकामध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे फुले व फळे तयार होण्यास अडथळा येतो. फुले फार लवकर कोमेजतात, ज्यामुळे फळांच्या उत्पादनात लक्षणीय घट होते. अशा परिस्थितीत, काही व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करून उत्पादक बोरॉनच्या कमतरतेचे दुष्परिणाम रोखता किंवा कमी करता येतात. बोरॉन हे पपई लागवडीतील एक महत्त्वाचे सूक्ष्म अन्नघटक आहे. कारण ते पेशींची निर्मिती आणि पुनरुत्पादन प्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे पपईमध्ये विविध लक्षणे दिसू शकतात, ज्यामुळे पिकाच्या एकूण आरोग्यावर आणि फळ उत्पादनावर वाईट परिणाम होतो.

विकृत पाने : पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेच्या सुरुवातीच्या लक्षणांपैकी एक म्हणजे कोवळी पाने विकृत होणे हे आहे. झाडाची पाने ठिसूळ होऊन वर किंवा खालच्या दिशेने गुंडाळले जातात. पानांच्या शिरा जाड होतात. पानांचा आकार लहान होतो, ज्यामुळे पाने कडक आणि विकृत दिसू शकतात. पानांच्या शिराजवळचा भाग पिवळा पडणे : बोरॉनच्या कमतरतेमुळे पपईच्या पानांमध्ये इंटरवेनल क्लोरोसिस यासारखी लक्षणे दिसतात. यामुळे पानांवर डाग पडतात किंवा ती पिवळी दिसतात. विशेषतः कोवळ्या पानांवर ही लक्षणे दिसतात.

झाडाची वाढ खुंटते : प्रादुर्भावीत झाडात पेशींचे विभाजन कमी झाल्यामुळे झाडांची वाढ खुंटते. कोंबाची वाढ होत नाही किंवा त्याची मर होते, ज्यामुळे झाडाची एकूण उंची आणि जोम कमी होतो. फुले आणि फळांची वाढ खुटते : पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे फुले आणि फळांचा विकास थांबतो. फुले अकाली कोमेजतात, ज्यामुळे फळांच्या उत्पादनात लक्षणीय घट होते.



याव्यतिरिक्त, जे फळ तयार होतात ते विकृत असू शकतात, फळांना तडे जाऊ शकतात ज्यामुळे त्यांची गुणवत्ता ढासळून ते विक्रीयोग्य राहत नाही. मुख्य खोड तडकणे : बोरॉनची कमतरता असलेल्या पपईच्या झाडांमध्ये अनेकदा मुख्य खोडामध्ये भेगा किंवा फूट दिसून येते, जे मुख्यता चिक गळण्यामुळे होऊ शकते. यामुळे झाडे कमकुवत होतात आणि रोग आणि कीटकांच्या प्रादुर्भावास अधिक बळी पडतात. पपई पिकात बोरॉनची कमतरता भरून काढण्याचे उपाय : पपईतील बोरॉनच्या कमतरतेच्या व्यवस्थापनासाठी माती आणि पानांवर फवारणी तसेच माती आणि पाण्याच्या गुणवत्तेचे परीक्षण करणे आवश्यक आहे. माती सुधारणा : पपईमध्ये बोरॉनची कमतरता दूर करण्यासाठी, बोरॅक्स (सोडियम बोरेट) किंवा सोल्युबर (सोडियम पेंटाबोरेट) सारखी बोरॉनयुक्त खते जमिनीतून देता येऊ शकतात. कमतरतेच्या तीव्रतेनुसार आणि मातीच्या प्रकारानुसार शिफारशीप्रमाणे साधारणतः १-२ किलो बोरॅक्स प्रति हेक्टर डोस द्यावे. बोरॅक्स हे जास्त प्रमाणात जमिनीत घालू नये, कारण ते विषारी होऊ शकते. पानांद्वारे फवारणी : बोरॉनच्या कमतरतेची लक्षणे लवकर भरून काढायची असल्यास पानांद्वारे फवारणी जास्त प्रभावी उपाय आहे. ०.२ ते ०.३% बोरॅक्स किंवा ०.१-०.२% सोल्युबरचे द्रावण झाडाची वाढ आणि पुनरुत्पादनाच्या अवस्थेत पानांवर फवारता येते. बोरॉनची पुरेशी पातळी राखण्यासाठी फुलधारणा आणि फळधारण अवस्थेत वारंवार फवारणी करणे गरजेचे असते.

माती परीक्षण आणि खत व्यवस्थापन : बोरॉनची पातळी निश्चित करण्यासाठी आणि त्यानुसार खतांचा वापर समायोजित करण्यासाठी नियमितपणे माती परीक्षण करणे आवश्यक आहे. ७.० (अल्कलाईन) पेक्षा जास्त सामू असलेल्या मातीत बोरॉनची उपलब्धता कमी होते, त्यामुळे सेंद्रिय पदार्थ किंवा सल्फर सुधारकाद्वारे मातीचे सामू नियंत्रित केल्यास मातीद्वारे बोरॉनचे चांगले शोषण होऊ शकते. सेंद्रिय कर्ब वाढवणे : जमिनीत सेंद्रिय कर्ब वाढल्याने बोरॉनची उपलब्धता वाढते. कंपोस्ट आणि चांगले कुजलेले खत केवळ बोरॉनचा पुरवठा करत नाही तर मातीची रचना, पाणी धरून ठेवण्याची क्षमता आणि पोषक द्रव्ये टिकवून ठेवतात. जे पपईच्या झाडाद्वारे चांगल्या प्रकारे शोषले जातात.

पाणी व्यवस्थापन : जास्त सामू (पीएच) किंवा कार्बोनेटयुक्त सिंचन पाणी बोरॉनची उपलब्धता कमी करू शकते. संतुलित मात्रात खनिज असलेल्या पाण्याचा वापर करून योग्य पाणी व्यवस्थापन करणे, झाडाजवळ अतिरिक्त पाणी साचणे किंवा पाण्याचा ताण टाळणे या उपायामुळे बोरॉन शोषण्यास मदत होऊ शकते. याव्यतिरिक्त, ठिबक सिंचनमुळे, मातीत योग्य प्रमाणात आर्द्रता राखण्यास मदत होते. संतुलित खत : बोरॉनच्या कमतरतेसह इतर पोषक तत्वांचे, विशेषतः कॅल्शियम आणि पोटॅशियमचे असंतुलन होते. यासाठी झाडाला संतुलित खत दिले पाहिजे, ज्यामध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांसह नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशियम यांसारख्या प्रमुख पोषक घटकांचा समावेश आहे, संपूर्ण झाडाच्या आरोग्यासाठी आणि वाढीस चालना देण्यासाठी हे आवश्यक आहे. वरील व्यवस्थापन धोरणांची अंमलबजावणी करून, पपई उत्पादक बोरॉनच्या कमतरतेचे परिणाम टाळू शकतात आणि कमी करू शकतात, निरोगी रोपांची वाढ, फुल आणि फळांचा योग्य विकास आणि उच्च उत्पादन सुनिश्चित करू शकतात. पपई लागवडीमध्ये बोरॉनचे प्रमाण पुरेसे राखण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण आणि वेळेवर नियोजन महत्त्वाचे आहे.

# शेतकऱ्यांचे विविध प्रकरण शिबिरस्थळीच निकाली काढा - आ. लोणीकर

## शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर’ अभिनव उपक्रमास सुरुवात

जालना । प्रतिनिधी

७ मार्च पासून जिल्हा प्रशासन नागरिकांच्या महसुली व प्रशासकीय समस्या गावपातळीवरच सोडविण्यासाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर’ या अभियानाची सुरुवात जालना जिल्ह्यात आज (दि.७ मार्च) करण्यात आली. या शिबिरामध्ये नागरिकांचा मोठा उत्सव व मोठ्या प्रमाणात नागरिकांचा प्रतिसाद मिळाला आहे.या शिबिरांच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ पोहोचविण्याचा अभिनव उपक्रम जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे प्रयत्न यशस्वी झाले . परतूर तालुक्यातील आष्टी मंडळातील खंडेश्वर मंदिर, आष्टी तसेच मंठा तालुक्यातील पांगरी गोसावी मंडळातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पांगरी गोसावी येथे आज शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही शिबिरांचे उद्घाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थित हजारो नागरिकांना मार्गदर्शन करताना आमदार



लोणीकर म्हणाले की, महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा या शिबिरांचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांच्या प्रलंबित महसुली प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही करून शक्य तितक्या समस्या शिबिरस्थळीच निकाली काढाव्यात, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

जमीन नोंदी, फेरफार, वारसा नोंद, उत्पन्न व जातीचे दाखले, तसेच विविध शासकीय योजनांबाबतची माहिती आणि लाभ यासंदर्भातील प्रश्नांचे निराकरण प्राधान्याने करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. दरम्यान, ग्रामपंचायत स्तरावर या शिबिरांची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, यासाठी सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

शिबिरांदरम्यान ७/१२ अभिलेखावरील दुरुस्ती, प्रलंबित फेरफार, नोंद दुरुस्ती, लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रमाणपत्रे, डिजिटल ७/१२, ई-मोजणी, ई-फेरफार, पीएम किसान, ॲग्री स्टॅक, तक्रार निवारण, भूसंपादन, अकृषिक जमिनीचे प्रकरणे, तुकडेबंदी, तसेच अकृषिक परवानगीसंदर्भातील नोंदी अद्ययावत करणे यासह विविध कामे करण्यात येणार असल्याचे यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात नमूद केले. तसेच प्रत्येक मंडळ मुख्यालयात एकखिडकी (सिंगल विंडो) प्रणाली स्थापन करून नागरिकांकडून प्राप्त अर्जांवर तत्काळ कार्यवाही करून त्याबाबत संबंधितांना कळविण्यात येणार आहे. भोगवटादार वर्ग-२ जमीन वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा डाटाबेस तयार करण्याचेही निर्देश या वेळी आमदार लोणीकर यांनी आपल्या भाषणात दिले. याशिवाय तालुक्यातील शाळांमधील पात्र विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यासाठी शाळास्तरावर अर्ज गोळा करून ते ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पूर्ण करण्यात येणार आहेत. तसेच सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करून शिबिरात मंजुरीचे आदेश वाटप करण्यात येणार आहेत. पाणंद रस्ते तसेच ‘सर्वांसाठी घरे’ योजनेअंतर्गत उर्वरित लाभार्थ्यांची यादी तयार करून शिबिरामध्ये पट्टे वाटप करण्याच्या दृष्टीनेही कार्यवाही करण्यात येणार असल्याचे श्री लोणीकर म्हणाले. याप्रसंगी मंठा तालुक्यातील गोसावी पांगरी येथे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, मंठा तहसीलदार श्रीमती सुमन मोरे, उपविभागीय कृषी अधिकारी मंठा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गगनबोने, मंठा तहसीलचे नायब तहसीलदार कल्याण काळजात विकास राजपूत डीडी कुलकर्णी विष्णुपुरी, मंठा तालुका कृषी अधिकारी , मंठा तालुका आरोग्य अधिकारी , मंठा तालुका भूमि अभिलेख अधिकारी यांच्यासह गावातील व परिसरातील हजारो महिला पुरुष शेतकरी शेतमजूर विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. तर् ? परतुर तालुक्यातील आष्टी येथे उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, परतूर तहसीलदार दामोदर जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी , परतुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी , तालुका कृषी अधिकारी , भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुगुण कणसे, तुकाराम सोळंके, परतूर नगरपरिषद चे अध्यक्ष शहाजी राक्षे, बंकटनाना सोळंके, माणिकराव वाघमारे, यांच्यासह आष्टी सर्कलमधील हजारो नागरिकांची यावेळी उपस्थिती होती.

## छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान शिबिर उत्साहात

### उसतोड कामगारासाठी विविध योजनाची मेजवानी



जालना । प्रतिनिधी

शासनाच्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान’ अंतर्गत आष्टी व कु. पिपळगाव येथे सामाजिक योजना समाधान शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन माजी मंत्री तथा आमदार मा. बबनराव भाऊ लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपजिल्हाधिकारी श्रीमती मनीषा दांडगे, उपजिल्हाधिकारी डॉ. पद्माकर गायकवाड, तहसीलदार दामोदर जाधव, परतुर गटविकास अधिकारी श्री. राजेश तागडे, गटशिक्षणाधिकारी डॉ. भरत वानखेडे, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगरचे प्रकल्प संचालक श्री. अप्पासाहेब उगले, जिल्हा संपर्क अधिकारी भाऊसाहेब गुजाळ, जिल्हा समन्वयक एकनाथ राउत, सोमेश्वर सोनटक्के तसेच स्वयंसेवक राजेश वाघमारे, महादेव खरात, आकाश चांगुले, योगेश आढे, सुरेखा वाघमारे, दुर्गा नाडे, बँक मित्र नारायण कनसे, रघुनाथ टेकाळे, सुनील वाहुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरामध्ये परतुर व घनसावंगी तालुक्यातील उसतोड कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध शासकीय योजनांची माहिती देऊन प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. आरोग्य व पोषण मार्गदर्शन, प्रमाणपत्रे, आयुष्मान भारत कार्ड, आधार कार्ड केवायसी, बँक विमा योजना, रोजगार हमी कार्ड, रेशन कार्ड दुरुस्ती, कृषी सौर पंप योजना तसेच बाल संगोपन योजनेसाठी अर्ज भरून घेण्यात आले. या शिबिरात उसतोड कामगारांच्या कुटुंबीयांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ३२० लाभार्थींनी सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळे स्थलांतरित उसतोड कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्यास मोठी मदत होत असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.उसतोड कामगार साठी शासनाच्या वतीने विविध योजना आखणी करण्यात आली त्या त्याना संसार उपयोगी सहित्य किराणा विमा इ योजना मिळणार आहे तरी प्रत्येक उसतोड कामगार नी ऑनलाईन नोदणी करणे अनिवार्य आहे ती आपन मराठवाडा ग्रामीण विकास संस्था वतीन मोफत करीत आहोत माश्री आप्पासाहेब उगले प्रकल्प संचालक मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर फोटो ओळी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मध्ये लाभार्थी याना उसतोड कामगार प्रमाणपत्र व बालसंगोपन इ योजनाचे आदेश पत्र वाटप करताना मा मंत्री आमदार बबनराव लोणीकर उपजिल्हाधिकारी श्रीमती मनिषा दांडगे उपजिल्हाधिकारी मा श्री पद्माकर गायकवाड तहसीलदार दामोधर जाधव प्रकल्प संचालक अप्पासाहेब उगले भाउसाहेब गुजाळ एकनाथ राउत सह आदी उपस्थित होते.

## शिवसैनिक अमोल जायभाये यांचे निधन

पाथर्डी । प्रतिनिधी



हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा कडवट शिवसैनिक म्हणून खरवंडी कासार परिसरात ओळख असलेले अमोल जायभाये वय वर्ष ३५ यांचे रविवारी दुःखद निधन झाले त्यांच्या पश्चात आई-वडील भाऊ पत्नी आणि दोन मुल असा परिवार आहे अमोल जायभाये हे संत भगवानबाबा उच्च माध्यमिक विद्यालय खरवंडी कासार येथे लिपिक म्हणून कार्यरत होते गेल्या काही दिवसांपासून ते दुर्धर आजाराने ग्रस्त असल्याने त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते परंतु रविवारी त्यांची प्राणज्योत मालवली अमोल जायभाये यांनी त्यांच्या हयातीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवसेना तालुका उपप्रमुख म्हणून काम पाहिले एक कडवट शिवसैनिक म्हणून त्यांची ओळख होती त्यांच्या आक्रमक परंतु तितक्याच शांत संयमी आणि मनमिळाउ स्वभावामुळे त्यांचा मित्रपरिवार मोठा होता त्यांच्या दुःखद निधनाने राजकीय सामाजिक शैक्षणिक व्यापारी व तळागाळातील सर्व घटकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

## महिला दिनानिमित्त सर्व रोग निदान आरोग्य शिबिर

### देवनाथ फाउंडेशन डॉ.ज्ञानेश्वर दराडे यांचा स्तुत्य उपक्रम!

पाथर्डी । प्रतिनिधी



पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथील देवनाथ फाउंडेशन अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर दराडे यांच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिनाच्या औचित्य साधत भगवानगड परिसरातील वंचित पीडित उपेक्षित ऊसतोड मजूर कामगारांच्या महिलांसाठी व नागरिकांसाठी सर्व रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये मधुमेह रक्तदाब नेत्र इसीजी असे विविध सर्वरोग निदान शिबिर संपन्न झाले या सर्व रोगनिदान शिबिराच्या माध्यमातून खरवंडी कासार परिसरातील जवळपास ११२ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली यावेळी अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध साई माऊली हॉस्पिटलचे संचालक डॉ.संतोष गीते डॉ.सारिका गीते डॉ.विद्या दराडे डॉ.सुभाष देशमुख डॉ.श्रीधर देशमुख शिक्षक नेते व टेंभुर्णी गावचे सरपंच मिथुन डोंगरे कृषी सहाय्यक ज्ञानेश्वर दौंड प्रकाश कटारिया चंद्रकांत कटारिया रमेश अंदूरे महादेव जगताप सागर घुले ऋषिकेश आव्हाड जय भगवान युवा प्रतिष्ठानचे अनिल जवरे योगेश अंदुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

> भगवानगड परिसर हा संत भगवानबाबांची कर्मभूमी असलेला ऊसतोड मजूर उपेक्षित वंचित घटकांचा समूह असलेला क्षत्रिय कष्टकरी परिसर आहे या परिसरामध्ये महिलांचे व ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या आरोग्य व शिक्षणासाठी श्रमिक प्रकल्प असावा हे स्वप्न आहे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्री पंकजा मुंडे व ज्येष्ठ नेते प्रताप ढाकणे यांच्या माध्यमातून प्रयत्न करणार आहे
>
> **- डॉ.ज्ञानेश्वर दराडे (देवनाथ फाउंडेशन खरवंडी कासार)**

## ३० लेकी चालवणार ‘ऑरेंज रिक्षा’ ; महिलांना सुरक्षित प्रवासाची हमी

### महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शहरात क्रांतिकारी पाऊल

अहिल्यानगर। प्रतिनिधी

महिलांना चूल आणि मुलाच्या चौकटीबाहेर काढून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शहरात एक क्रांतिकारी पाऊल उचलण्यात आले आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत, अहिल्यानगरमधील ३० जिद्दी महिला आता ‘ऑरेंज रिक्षा’चे स्टेअरिंग हाती घेऊन स्वावलंबनाची भरारी घेण्यास सज्ज झाल्या आहेत. सन फार्मा कंपनी आणि मिटकॉन फोरम सोशल फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमांतर्गत गरजू महिलांना २५ दिवसांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. यात २० दिवस तांत्रिक ड्रायव्हिंग आणि ५ दिवस वाहतूक नियम, संवाद कौशल्य व शहराच्या



मार्गांची माहिती देण्यात आली. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर या महिलांना परमिट मिळवून देण्यासाठी आणि जिल्हा उद्योग केंद्राकडून बँक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी विशेष सहकार्य केले जात आहे. लवकरच या ३० ‘ऑरेंज रिक्षा’ शहरातील शाळा, महाविद्यालये आणि एमआयडीसी परिसरात धावताना दिसतील. यामुळे महिला आणि विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुखकर होणार आहे. रेश्मा आठरे यांनी या प्रकल्पासाठी पुढाकार घेतला आहे. मिटकॉनचे प्रोजेक्ट डायरेक्टर अकबर शेख हेही प्रयत्नशील आहेत. या प्रवाहात अनिता भस्मे, अपर्णा पालवे, अश्विनी डोळसे, भारती साळवे, भावना शिंगवी, दीपाली लुंगसे, दीपाली अवसरे, ज्योती गायकवाड, ज्योती दातरंगे, कावेरी वाकणकर, किरण सरोदे, कोमल डोखे, मंदा भवार, मनिषा धोत्रे, नीता पाचारणे, पल्लवी पवार, प्राप्ती पारधे, प्रियांका आढाव, राणी पगारे, रंजना कांबळे, संगीता पारधे, सानिया शेख, शीतल गाडे, वैष्णवी वाघ, वंदना थोरवे, वंदिता भिंगारदिवे, वनिता पाडळे, सपना आव्हाड या रणरागिणी सामील झाल्या आहेत. निर्भिड स्वसंरक्षणाचे मिळाले कवच आत्मविश्वासाने रिक्षा चालवण्यासोबत संकटकाळी स्वतःचे संरक्षण कसे करावे, याचे खास प्रशिक्षण या महिलांना आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू अंजली देवकर-वल्लाकट्टी यांनी दिले. प्रवाशांशी सुसंवाद साधण्यासोबतच पोलिस आणि प्रशासनाशी समन्वय ठेवण्याचे मार्गदर्शन या महिलांना मिळाले आहे. यामुळे या महिला चालक निर्भयपणे रस्त्यावर उतरून प्रवाशांची सुरक्षितता जपतील. सुरक्षिततेचा नवा भरोसा मिळणार या ३० महिला रिक्षा चालकांमुळे रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या महिला, विद्यार्थिनी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल. महिला चालकांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास यामुळे मदत होईल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत हा एक अत्यंत विश्वासार्ह आणि सुरक्षित पर्याय ठरणार आहे.

## बाल हक्कांसाठी ग्रामपंचायतींना विशेष प्रशिक्षण

### मुलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढवण्यासाठी बाल पंचायत, बाल सभांवर भर

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) आणि यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे ग्रामपंचायतींसाठी बाल हक्कांवरील दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ५ आणि ६ मार्च रोजी प्रथम अरोरा सेंटर फॉर एज्युकेशन () येथे ही कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर आणि नाशिक या चार विभागांतील २० जिल्ह्यांमधील ५० ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामविकास अधिकारी असे सुमारे ९७ प्रतिनिधी सहभागी झाले होते. ग्रामपंचायत विकास आराखड्यासारख्या स्थानिक नियोजन प्रक्रियेत मुलांचा सहभाग वाढवणे आणि त्यांच्या समस्यांचा समावेश करण्यासाठी ग्रामपंचायत प्रतिनिधींना प्रोत्साहन देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

कार्यशाळेतील सत्रांचे मार्गदर्शन यशदा येथील प्राध्यापक डॉ. राम पोले, च्या



सामाजिक धोरण तज्ज्ञ डॉ. देविका देशमुख, च्या प्रशासकीय अधिकारी वंदना जैन आणि , बेंगळुरूच्या डॉ. प्रिया नाम्बियार यांनी केले. गावातील निर्णय प्रक्रियेत मुलांचा आवाज प्रभावीपणे पोहोचावा यासाठी बाल पंचायत आणि बाल सभांच्या संकल्पनेचा प्रभावी वापर कसा करावा, यावर कार्यशाळेत विशेष भर देण्यात आला. चे माजी सदस्य ॲड. संजय सेंगर यांनी बाल संरक्षण प्रणाली आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका स्पष्ट केली, तसेच ने बाल सभा राबविण्याचे अनुभव सादर केले. कार्यशाळेदरम्यान सहभागी प्रतिनिधींनी त्यांच्या ग्रामपंचायतींमधील अनुभव मांडले. नांदेड जिल्ह्यातील येरगी गावाच्या सरपंचांनी सांगितले की, त्यांच्या गावात बाल पंचायत सुरू केल्यानंतर परिसरातील इतर गावांनाही ही संकल्पना राबवण्याची प्रेरणा मिळाली असून बाल सहभागाला अधिक चालना मिळाली आहे.ही कार्यशाळा महाराष्ट्रातील व्यापक बाल सहभाग उपक्रमाचा एक भाग आहे. यशदाकडून निवडलेल्या मास्टर ट्रेनर्सच्या माध्यमातून विविध जिल्ह्यांमध्ये बाल हक्क मॉड्यूल राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे स्थानिक प्रशासन अधिक बाल-प्रतिसादक बनवणे आणि बाल हक्कांबाबत सामुदायिक मालकी मजबूत करणे हा उद्देश आहे. या प्रशिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथील सरपंच योगेश कोठुळे, सविता निकुंभ, संजय गरड आणि जयश्री दिवेकर यांची उपस्थिती होती. तसेच राज वानखेडे (), जॉर्ज क्रिस्टो (युनिसेफ), सत्र समन्वयक सतीश वानखेडे, वैष्णवी अय्यर (युनिसेफ) आणि मधुकर मोरे यांनी कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात



घनसावंगी । प्रतिनिधी

तालुका घनसावंगी मधील कुंभार पिंपळगाव या महसूल मंडळात आज महसूल विभागा अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा १ हे नागरिकांच्या प्रचंड प्रतिसादात उत्साहात संपन्न झाले.

शिबिरास तालुक्यातील सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहून नागरिकांच्या अर्ज स्वीकारून नागरिकांना प्रत्यक्ष सेवेचा लाभ दिला. यावेळी तहसीलदार रमेश पागोटे, नायब तहसीलदार संतोष इथापे, सोमनाथ तोतला, मोनाली सोनवणे, उपअधीक्षक भूमिअभिलेख बिदरकर, दुय्यम निबंधक मनीषा पैठणे, मंडळ अधिकारी प्रविण गजरे, ज्ञानेश्वर चौरे, ग्राम महसूल अधिकारी महेंद्र साळव, एन एम येवतीवाड, भरत बारसे, गंगाधर जाधव, मंडळ कृषी अधिकारी श्री लोंढे, सहायक कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी सुनील खोडदे, आरोग्य अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी इ सह मोठ्या प्रमाणात अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या अभियानात एकूण १३८९ नागरिकांना लाभ देण्यात आले. तहसीलदार श्री पागोटे यांनी शिबिराबाबत सविस्तर माहिती दिली. श्रीमती मोनाली सोनवणे यांनी आभार मानले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार दि.०९ मार्च २०२६


# तहसीलदारसाहेब, सत्तेपुढे शहाणपण चालत नाही हे पुन्हा एकदा वाळू माफियांनी दाखवून दिले

## महसूलच्या नाकावर टिच्चून मंजरथ घाटावरुन केनीच्या साहाय्याने अवैध उपसा सुरुच

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या मंजरथ -१ हा वाळुघाटाचा २०२५-२०२६ लिलाव झालेला असून आजघडीला गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी असल्याने लिलावधारकास या वाळुघाटावरुन मजुरांच्या साह्याने वाळु उपसा करता येत नसल्याने लिलावधारकाने या वाळुघाटावरुन महसूल विभागाच्या नाकावर टिच्चून अनाधिकृतपणे केनीच्या साहयाने

वाळु उपसा करून पोकलेन व जेसीबीच्या सहाय्याने वाहाने भरण्यात येत असुन वाळु वाहतूक करणाऱ्या कोणत्याही वाहनांना जि.पी.आर.सिस्टीम न लावतात वाहनात इनव्हाईज प्रमाणे वाळु न भरता ओव्हरलोड वाळु वहानात भरत असल्याने या वाळुघाटचे लिलावधारक जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या कार्यारंभ आदेशाप्रमाणे लिलावाच्या अटी व शर्ती चे या वाळु घाटावर कोणत्याही प्रकारचे तंतोतंत पालन न करता अनेक वेळा उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास येत असून याप्रकरणी महसूल प्रशासनाने संबंधित लिलावधारकास अनेक वेळा नोटीस देऊन दंडात्मक कारवाईचा बडगा उगारुन सदर वाळु घाटावरुन लिलावातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास सदर वाळु घाट रद्द करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना पाठवण्याचा सज्जड दम देऊन सुद्धा या वाळु घाटावरुन अनाधिकृतपणे केनीच्या साहाय्याने रात्र-दिवंस वाळु उपसा करून अनाधिकृतपणे जेसीबी व पोकलेनच्या साहाय्याने जि.पी.आर.एस.सिस्टीम न बसलेले ओव्हरलोड वाहने भरुन अनाधिकृतपण विनाभोबाट वाळु घाट सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे.

माजलगाव तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या मंजरथ -१ येथील वाळू घाट लिलावधारकांनी वाळु वाहतूक करणाऱ्या



वाहनांना सुरुवातीच्या पहिल्या ट्रिपच्या इनव्हाईज पावतीवर दिवसभर एकच वाहानातुन दिवसभर बिगर इनव्हाईजच्या अनेक खेपा सुरु सदर वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना इनव्हाईज न देता १८ हजार द्या अन् हायवा भरुन न्या असा नवा नियम काढल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. तर

### सीसीटीव्ही, जीपीएस व शासनाने घालून दिलेले नियम मोडल्यास थेट कारवाई हे आदेश हवेत फुस्स

### महसूल अन् पोलिसांचीच आता टेंडरमध्ये भागिदारी झाली की काय असं वाटतय

विना पावत्या (इनव्हाईज )वाहतूक करायची असेल तर प्रशासनाचा हप्ता बांधला असल्याची चर्चा सुरू झाल्याने यामुळे प्रशासनच वाळूत भागीदार झाल्याचे चित्र निर्माण झाले असल्याने आता तक्रार करावी कोणाकडे असा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी तहसीलदार यांच्यावर राजकीय दबाव असल्याचे बोलले जात असल्याने प्रशासनाने कितीही नियम,कायदे, कारवाया केल्यातरी त्यांचं सत्तेपुढे शहाणपण चालत नाही यावर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा सुरू झाली आहे

मंजरथ येथील ई निविदाद्वारे मान्यताप्राप्त वाळू घाटावर शासन नियमाची पायमल्ली

सीसीटीव्ही, जीपीएस व शासनाने घालून दिलेले नियम मोडल्यास थेट कारवाई हे आदेश हवेत फुस्स झाल्याची चर्चा सध्या मोठ्या प्रमाणावर सुरू असुन तालुक्यातील मंजरथ वाळूघाटावर शासनाने घालून दिलेल्या नियम व अटींचे उल्लंघन होत असल्याच्या अनेक तक्रारी गावकरी व सामाजिक पान ३ वर

# तालुक्यातील विकासाच्या प्रश्नांवर व्यापक जनआंदोलनाची गरज –पांडुरंग नागरगोजे

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील अनेक विकासकामे वर्षानुवर्षे प्रलंबित असून त्यासाठी व्यापक जनआंदोलन उभे राहण्याची गरज असल्याचे मत कृषी उत्पन्न बाजार समिती चे उप सभापती पांडुरंग नागरगोजे यांनी व्यक्त केले आहे.



तालुक्यात बाजार समितीच्या रस्त्यावरचा पूल, दफनभूमीकडे जाणारा पूल, सेंट्रल बिल्डिंग, पंचायत समितीची इमारत, क्रीडांगण अशा अनेक महत्त्वाच्या कामांचे प्रश्न प्रलंबित आहेत. या कामांकडे शासन आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरगोजे यांनी सांगितले.

ते म्हणाले की, पश्चिम महाराष्ट्रात ज्या प्रकारे उपसा सिंचन योजना राबविण्यात आल्या, त्याचा मोठा फायदा शेतकऱ्यांना झाला आहे. त्याच धर्तीवर आष्टी तालुक्यातील काही भागात कुकडीसारखी सुमारे ७२ किलोमीटरची उपसा सिंचन योजना सुरू झाली. मात्र आपल्या तालुक्यात अशा योजनांसाठी कोणत्याही सरकारने किंवा लोकप्रतिनिधींनी ठोस मागणी केली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.या प्रश्नांवर जर ठोस आणि सातत्यपूर्ण मागणी करण्यात आली असती किंवा व्यापक जनआंदोलन उभे राहिले असते, तर अनेक प्रश्न आतापर्यंत मार्गी लागले असते, असेही त्यांनी सांगितले.आम्ही साधे कार्यकर्ते असल्यामुळे आमच्या बोलण्याला फारसे गांभीर्याने घेतले जात नाही. मात्र तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी हे प्रश्न मनावर घेतले, तर थोडा वेळ लागेल; पण निश्चितच हे प्रश्न मार्गी लागतील, असेही पांडुरंग नागरगोजे यांनी नमूद केले.

# हायवेवर दरोडा टाकणाऱ्या टोळीस पोलीस अधीक्षकांनी लावला मिनी मकोका

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्याचा कार्यभार स्वीकारल्यापासुन बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या, घरफोड्या, जबरी चोऱ्या, दरोडा टाकणारे गुन्हेगारावर पोलीसांची करडी नजर आहे. त्याअंनुषगाने त्यांनी जिल्ह्यात घडणा-या चोरी/दरोड्याच्या गुन्ह्यातील आरोपीस तात्काळ अटक करून त्यांच्याकडुन चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करून त्यांची गुन्हेगारी पाश्वभुमि तपासुन कठोर कारवाई करण्याच्या सुचना बीड जिल्ह्यातील सर्व पो. स्टे प्रभारी अधिकारी यांना दिलेल्या आहेत.

दि.०४.१२.२०२५ रोजी यातील फिर्यादी शिवप्रसाद किशोरकुमार पौने वय ३२ वर्षे व्यवसाय खाजगी नोकरी रा. कल्पना सोसायटी गणेश नगर ता. खुदबुल्लापुर जि. रंगारेड्डी राज्य तेलंगणा याने फिर्याद दिली की, मी व माझा परीवार दिं.१३.१२.२०२५ रोजी रात्री खाजगी गाडीने शिर्डी येथे दर्शनासाठी जात होते. तेव्हा रात्री १२.३० वा सुमारास शिवशारदा शाळेजवळ बाथरुमला थाबलो असता. यातील अनोळखी अरोपीतांनी गाडीची चावी काढुन गाडीचे नुकसान करुन अनोळखी चार चोरट्यांनी हल्ला करुन लोखंडी रॉडने मारुन धाक दाखवुन आमच्या जवळी चोन्या चादीचे दागिने किमती ३,४६,०००/-रुपये बळजबरीने चोरुन नेले वगैरे मजकुरचे फिर्यादी वरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास सपोनि अण्णासाहेब पवार हे करीत आहेत.



यातील आरोपी निष्पन्न करून त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आले. एकुन सहा आरोपीतांनी हा गुन्हा केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. त्यापैकी तीन आरोपीना पकडण्यात पोलीसांना यश आलेले आहे. अटक आरोपीतांची नावे १. राहुल अनिल काळे वय १९ वर्षे २. विकास अनिल काळे वय २१ वर्षे ३. अनिल रामा काळे वय ४० वर्षे सर्व रा. खामकरवाडी ता. वाशी जि.धाराशिव अशा तीन आरोपीतांना दि. १२.१२.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. त्यांची पीसीआर घेवुन तपास करण्यात आला. पीसीआर दरम्यान आरोपीच्या ताब्यातुन ४,२९,०००/- रूपयाचे सोन्या चांदीचे दागिने व नगदी रोख रक्कम जप्त करण्यात आले आहेत. तसेच गुन्हयात वारलेली १० लाख रुपये किंमतीची हेक्टर चार चाकी गाडी जप्त करण्यात आली आहे. गुन्हयातील इतर निष्पन्न तीन आरोपी फरार आहेत. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

यातील टोळी प्रमुख याने संघटीत गुन्हेगाराची टोळी तयार करून संघटीतरित्या बीड जिल्हयात ०५ गंभीर स्वरुपाचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हे हे शस्त्राचा धाक दाखवुन आर्थिक फायद्यासाठी केल्याचे निष्पन्न झाल्याने बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री नवनीत पान ३ वर

# माजलगावच्या माहेश्वरी महिला मंडळाचा स्तुत्य उपक्रम: ७५ वर्षांवरील ज्येष्ठांचा सन्मान आणि होळीचा उत्साह!

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिन आणि होळीचे औचित्य साधून एका दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमात समाजातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ महिलांचा सन्मान करून त्यांच्या अनुभवांचा गौरव करण्यात आला.**



कार्यक्रमाची मंगलमयी सुरुवात प्रमुख पाहुण्या डॉ. काकानी मॅडम व बीड जिल्हा उपाध्यक्ष सौ. वर्षा भक्कड़ आणि सहसचिव सौ. माया चांदक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी बोलताना वक्त्यांनी महिलांच्या समाजातील अमूल्य योगदानावर प्रकाश टाकला.

या सोहळ्याला उपस्थित प्रमुख पदाधिकारी: अध्यक्षा: अलकनंदा मानधने, उपाध्यक्ष: वर्षा बजाज सचिव: अनिता मुंधडा, सहसचिव: सुगुणा तेला, कोषाध्यक्ष: किरण कासट, सहकोषाध्यक्ष: सुरेखा जेथलिया, संघटन मंत्री: रत्नमाला इंदाणी याप्रसंगी स्नेह संपदा समितीच्या सदस्यांची देखील उपस्थिती होती. ७५ वर्षांवरील माऊलींच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांचा झालेला यथोचित सन्मान हा या कार्यक्रमाचे खरे यश ठरले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी होळीचा सण पारंपरिक उत्साहात साजरा केला. हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी अहोरात्र कष्ट घेतले. माजलगाव शहरात या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पॅरामेडिकल कोर्सच्या विद्यार्थ्यांना एस.ई.बी.सी प्रवर्ग लागू करण्यात यावा

## पॅरामेडिकल कोर्सच्या विद्यार्थ्यांच्यां पालकांचे आ.प्रकास सोळंकेना निवेदन सादर

माजलगाव । प्रतिनिधी

पॉरामेडीकल कोर्सच्या शासकीय व खाजगी माहा विद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ओबीसी विद्यार्थ्यांच्या धर्तीवर एस.ई.बी.सी.च्या विद्यार्थ्यांना सवलत देण्यात यावीत या मागणीसाठी पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांनी दि ०८ मार्च रविवार रोजी प्रतिनिधिक स्वरूपात आ.प्रकाश सोळंके यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आ.प्रकाश सोळंके यांनी हा प्रश्न अधिवेशनात मांडण्यात येईल असे आश्वासन पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांना दिले

यासंदर्भात पॉरामेडीकल कोर्सच्या विद्यार्थीच्या पालकांनी दि ०८ मार्च रविवार रोजी आ.प्रकाश सोळंके यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद केले आहे की,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर (घाटी ) या महाविद्यालयात पान ३ वर



# एचव्हीपी लस घेऊ नका; ही लस लोकसंख्या कमी करण्याचं षडयंत्र-राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**

अनेक शाळा महाविद्यालयामध्ये पंधरा वर्षांपुढील मुलींना लस दिली जात आहे. कोणत्याही पालकांनी आपल्या मुलीला ही लस देऊ नये हे लोकसंख्या कमी करण्याचे खूप मोठे षडयंत्र आहे, कोरोना हे लोकसंख्या कमी करण्याचा षडयंत्र होते हे एपस्टीन फाइल मध्ये उघड झाले आहे. तसंच लस सुद्धा एक षडयंत्र आहे.



करोना फाईल मध्ये नाव आलेले बिल गेस्ट हा अतिशय पाताळ यंत्र माणूस आहे आणि ह्या बिल गेस्ट याला जगाची लोकसंख्या कमी करायची आहे. कोरोनाच्या नावाखाली अनेक नागरिकांना लसीकरण केलं. रेमडीसीवर सारखी घातक इंजेक्शन आहे वापरून अनेकांचा जीव घेण्याचे काम या इजराइल मधल्या येहुदी १३ कुटुंबीयांच्याच्या वतीने एलुमिनिटी सारखी पाताळ यंत्र संघटना चालवली जाते. या सर्वांना जगाची लोकसंख्या कमी करायची आहे म्हणून आता कोरोना नंतर एच व्ही पी लसीकरण देण्याची खूप मोठे षडयंत्र भारतात राबवले जात आहे. तरी सर्व पालकांना विनंती की बाबांनो आपली लेकरं वाचली पाहिजेत शाळेत सर्वांना सूचना द्या की पालकाच्या सूचने शिवाय की पालकाच्या सहमतीशिवाय कोणतीही लसीकरण घेऊ नका आणि सर्व पालकांना विनंती की आपल्या लेकरांना कोणतेही लसीकरण देऊ नका सरकार हे इजराइल इशाऱ्यावर चालणाऱ्या आहे त्यामुळे तात्काळ सर्वांनी ही लस आपल्या लेकरांना देऊ नका लेकरं वाचवा हि सर्वांना राजेंद्र आमटे यांच्या वतीने विनंती करण्यात येत आहे.

# खंडेश्वरी मंदिर रस्त्यावरील कचरा डम्पिंग ग्राउंडकडे

## स्वच्छता सभापती शेख निजाम यांच्या पुढाकाराने खंडेश्वरी परिसर झाला स्वच्छ



### शेख निजाम पाच वाजल्यापासूनच कामाला



नगरपालिकेचे नूतन पाणीपुरवठा स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी पदभार घेतल्यापासून ते दररोज एका वार्डात सकाळी पाच वाजताच कर्मचाऱ्यांना घेऊन साफसफाई चे कामे करतात. प्रत्येक वार्डात एक दिवस दिल्याने बीड शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात स्वच्छता साफसफाई चालू असून यापुढेही हा उपक्रम चालू राहील. गेल्या अनेक दिवसापासून खंडेश्वरी मंदिर परिसरात कचरा टाकल्याच्या तक्रारी होत्या. हा कचरा तीन दिवसांपूर्वीच शेख निजाम यांनी उचलण्यास सुरुवात केली असून खंडेश्वरीच्या या रस्त्याचा श्वास मोकळा करण्यात आला आहे. हा सर्व कचरा शेख निजाम यांच्या पुढाकाराने नाक्यावर असलेल्या डंपिंग ग्राउंड कडे हलवण्यात आला आहे. त्यामुळे हा परिसर स्वच्छ झाला आहे.

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील विविध भागातून गोळा केलेला कचरा खंडेश्वरी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात टाकण्यात आल्यामुळे निर्माण झालेल्या अस्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर आ विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे,उपनगराध्यक्ष विनोद मुळूक,प्रतिनिधी शेख मुजीबभाई, गटनेता फारूक पटेल, नगर सेवक अमर नाईकवाडे व इतर नगरसेवक,मुख्याधिकारी हे परिसराची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आले होते. त्याच अनुषंगाने. रविवारी स्वच्छता सभापती शेख निजाम व स्वच्छता विभागाच्या पुढाकाराने खिंड परिसरातील कचरा उचलण्याचे काम बुधवारच्या अगोदरच सुरू करण्यात आले असून हा सर्व कचरा नाळवंडी नाका येथील डंपिंग ग्राउंडमध्ये टाकण्यात येत आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त घंटा गाडीत कचरा टाकावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

बीड शहर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी नगरपरिषदेच्या वतीने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.


प्रत्येक वार्डात एक मोठी कचराकुंडी असावी

बीड शहरामध्ये पान ३ वर

# मागासवर्गीयांच्या अंत्यविधीला होणाऱ्या विरोधावरून आ.अमित गोरखे विधानसभेत आक्रमक

बीड । प्रतिनिधी

एकीकडे महाराष्ट्र पुरोगामी असल्याचे मिरवत असतानाच, दुसरीकडे ग्रामीण भागात आजही दलित आणि मागासवर्गीय समाजाला आपल्या प्रियजनांच्या अंत्यसंस्कारासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. या गंभीर प्रश्नावर भाजप आमदार अमित गोरखे यांनी विधानसभेत आक्रमक पवित्रा घेत सरकारला धारेवर धरले. ''मरणानंतरही सन्मान मिळत नसेल, तर हे राज्यासाठी भूषणावह नाही,'' अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.



राज्यातील अनेक ग्रामीण भागांत सार्वजनिक स्मशानभूमीत मागासवर्गीय व्यक्तींच्या अंत्यविधीला सवर्ण किंवा स्थानिक लोकांकडून विरोध केला जातो. अनेक ठिकाणी कागदोपत्री स्मशानभूमी असूनही प्रत्यक्षात तिथे जाण्यासाठी रस्ते नाहीत. परिणामी, हक्काची जागा नसल्यामुळे भूमिहीन मागासवर्गीयांना चक्क रस्त्यावर किंवा उघड्यावर अंत्यसंस्कार करावे लागत असल्याच्या घटना घडत आहेत.

आ. अमित गोरखे यांनी सभागृहाचे लक्ष वेधताना सांगितले की, ''छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या विचारधारेच्या राज्यात आजही जातीवरून अंत्यविधी अडवले जात आहेत. ही लोकशाही आणि संविधानाची पायमल्ली आहे.''

या संवेदनशील मुद्द्यावर गोरखे यांनी सरकारला काही टोकदार प्रश्न विचारत खालील मागण्या केल्या आहेत: त्या मध्ये ज्या गावांत अंत्यविधीला विरोध होतो, त्या ठिकाणचे पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामसेवक आणि तलाठी यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याबद्दल तातडीने विरोध करणाऱ्या दोषी व्यक्तींवर तातडीने ऍट्रॉसिटी कायद्यांतर्गत अजामीनपात्र गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी. अशा कठीण प्रसंगी पीडित कुटुंबाला तत्काळ मदत मिळण्यासाठी सरकारने एक स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करावी.

तक्रार मिळताच पोलीस संरक्षणात सन्मानाने अंत्यविधी पार पडेल याची जबाबदारी थेट जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवण्यात यावी.

### एक गाव, एक स्मशानभूमी केवळ कागदावरच?

**शासनाच्या एक गाव, एक स्मशानभूमी या योजनेचा समाचार घेताना गोरखे म्हणाले की, ही योजना केवळ जाहिरातींपुरती मर्यादित राहिली आहे. तिची प्रत्यक्ष आणि सक्तीने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. किमान मृत्यू झाल्यानंतर तरी माणसाला सन्मानाने निरोप मिळावा, ही माफक अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.आमदार अमित गोरखे यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नानंतर आता राज्य सरकार दोषींवर काय कारवाई करते आणि ग्रामीण भागातील हा जातीय भेद संपवण्यासाठी कोणते ठोस धोरण आखते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.**

# एसटीचे सवलत कार्ड काढण्यासाठी नागरिकांची धावपळ

### अंगठा बसवण्यासाठी नागरिकांची ससेहोलपट

चौसाळा । प्रतिनिधी

एसटी महामंडळाने सवलत दरात प्रवासासाठी आता एम एस एन एस स्मार्ट कार्ड जवळ असणे आवश्यक आहे एसटी सदर कार्ड काढण्यासाठी वृद्धासह महिला व वृद्ध नागरिकांची गर्दी वाढतच आहे परंतु अनेक नागरिकांचे हाताचे ठसे उमटत नसल्याने त्यांना कार्ड विना परत जावे लागत आहे त्यांची ससे होलपट होत आहे त्यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सवलत दराने प्रवास करण्यासाठी एसटीचे स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे सदर कार्ड हस्तगत करण्यासाठी नागरिकांना आपल्या हाताचे ठसे द्यावे लागत आहेत तर अनेक नागरिकाचे तांत्रिक अडचणीमुळे किंवा वयस्कर झाल्यामुळे त्यांचा अंगठा बसत नाही त्यामुळे त्यांचे नोंदणी करण होत नाही एसटी महामंडळाने ज्यांचा अंगठा बसत नाही यासाठी इतर मार्गाचा अवलंब करून त्यांची अडचण दूर करावी अशी वृद्ध नागरिकांतून मागणी करण्यात येत आहे

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk
दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...


# आरटीई प्रवेशासाठी २० शाळांचा अल्पसंख्याक दर्जा रद्द; राज्यात जागा वाढल्या

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यानुसार आर्थिक दुर्बल तसेच आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शाळांमधील २५ टक्के जागांवर देण्यात येणाऱ्या आरटीई प्रवेश प्रक्रियेतून पळवाट काढण्यासाठी काही शाळांनी अल्पसंख्याक दर्जा मिळवला होता. परंतु मप्राथमिकफचे शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी राज्यातील तब्बल २० शाळांचा अल्पसंख्याक दर्जा नाकारला असून, त्यांना आरटीई प्रवेश देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आरटीई प्रवेशाच्या जागा वाढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्याचे माजी




उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या मृत्यूनंतर राज्यभर दुखवटा जाहीर झाला असताना काही तासांत ७३ शाळांनी अल्पसंख्याक दर्जा मिळवला. त्याला मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्थगिती दिल्याचे सांगितले. मात्र, प्रत्यक्षात त्यांची नोंदणी शालेय विभागाच्या आरटीई नोंदणीमधून कमी करण्यात आलेली होती. याचा परिणाम हा उपलब्ध पटसंख्येवर होणार होता. यासंदर्भात आम आदमी पार्टीचे मुकुंद किर्दत यांनी अल्पसंख्याक विभाग तसेच शिक्षण विभाग यांच्याशीही पत्रव्यवहार केला. त्यानंतर शिक्षण विभागाने या सर्व शाळा आरटीई नोंदणीमध्ये घेण्याचे आदेश ४ मार्च रोजी काढले असून, पालक वाट पाहत असलेल्या राज्यभरातील पोतदार इंटरनॅशनल, सेंट झेवियर तसेच इतर सर्व संस्थांच्या शाळा या शिक्षण विभागाच्या आदेशानुसार पालकांना प्रवेशासाठी उपलब्ध होणार आहेत.

यापूर्वी ८ हजार ६५१ शाळा नोंदवल्या गेल्या होत्या. ती संख्या ८ हजार ६८८ पर्यंत वाढली असून, उपलब्ध पटसंख्या १,१२,७७२ वरून १,१४,०६३ पर्यंत वाढली आहे. सर्व शाळांची नोंदणी पूर्ण झाल्यावर ही संख्या अजून वाढण्याची शक्यता आहे. यामुळे मात्र आता नवीनच अडचण निर्माण झाली. आरटीई प्रवेशातून पळवाट काढण्यासाठी शाळांनी अल्पसंख्याक दर्जा मिळवल्याचे शिक्षण विभागाकडे पुराव्यानिशी सिद्ध केले. त्यानंतर आता संबंधित शाळांमध्ये जागा उपलब्ध होणार आहेत; परंतु त्या उपलब्ध जागांसाठी अर्जात दुरुस्तीची मागणी पालकांकडून होत असताना स्थानिक शिक्षणाधिकारी मात्र उडवाउडवीचे उत्तरे देत आहेत. आता ते होणार नाही, असे सांगत आहे. चुका झालेला अर्ज रद्द, डिलीट करता येण्याची मागणी अनेक पालक करीत असून, याबाबतीत शिक्षणाधिकाऱ्यांना अधिकार असूनसुद्धा पालकांशी ते असहकार्य करीत आहेत. शिक्षण विभागाने याची तातडीने दखल घेऊन याबाबतीत सॉफ्टवेअरबदल अथवा शिक्षणाधिकाऱ्यांना सूचना देण्याची गरज आहे.

## निरा-कऱ्हा नदीजोड प्रकल्प फक्त घोषणा; निधी नाही: सुप्रिया सुळे

**बारामती । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात निरा-कऱ्हा नदीजोड प्रकल्पाची फक्त घोषणा केली आहे. योजनेसाठी निधीची तरतूद मात्र केली नसल्याने ही केवळ घोषणाच असल्याचे सिद्ध होत आहे, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे.



मुख्यमंत्र्यांनी निरा-कऱ्हा सिंचन प्रकल्पाबाबत केलेल्या घोषणेचा उल्लेख करीत सुळे यांनी ट्विट केले असून, ही निव्वळ घोषणा ठरू नये, ठोस निधीची तरतूद करून लवकरात लवकर काम सुरू होण्याच्या दृष्टीने आखणी करण्यात यावी, म्हणजे बारामती आणि पुरंदर तालुक्यांतील अवर्षणग्रस्त नागरिकांत संभ्रम राहणार नाही, अशी मागणी केली. निरा व कऱ्हा नदीच्या पाण्याची महत्त्वाकांक्षी योजना हे स्व. अजितदादा पवार यांचे स्वप्न होते. त्यासाठी अजित पवार प्रयत्नशील होते, असे सुळे यांनी म्हटले आहे. अजित पवार यांनी आपण या योजनेसाठी १ हजार कोटी रुपयांची तरतूद करीत असून, त्या माध्यमातून सुमारे अडीच टीएमसी पाणी साठविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले होते. दुर्दैवाने आज आपल्यात अजित पवार नाहीत. त्यांच्या जागी अर्थमंत्री या नात्याने फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी विविध प्रकल्पांची घोषणा केली. अगदी निरा-कऱ्हा उपसा सिंचन प्रकल्पाचासुद्धा त्यांनी उल्लेख केला. मात्र, त्यासाठीच्या निधीच्या तरतुदीचा उल्लेख मात्र केला नाही, असे सुळे यांनी नमूद केले.

## २०१९ च्या मिस इंडिया स्पर्धेतील सुंदरीचं शुद्धीकरण, पुण्यातील सायलीची हिंदू धर्मात वापसी; खासदार-आमदारांची उपस्थिती

**पुणे । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी इंदापूरमधील एका मुलीचे अपहरण केल्याची घटना घडल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. मात्र, दुसऱ्याच दिवशी तिने आपण स्वत:हून पळून गेल्याचा व्हिडिओ बनवत लग्न केल्याची माहितीही दिली होती. त्यानंतर, लव्ह जिहाद म्हणत आमदार गोपीचंद पडळकर यांच्यासह काहींनी हा मुद्दा उचलून धरल्याचं दिसून आलं. त्यातच, आता पिंपरी चिंचवडमधील सायलीने आपल्या पतीला सोडून पुन्हा हिंदू धर्मात वापसी केली आहे. २०१९ ची मिस इंडिया अर्थ स्पर्धेतील सुंदरी सायली सुर्वे हिचं शुद्धीकरण करून तिला हिंदू धर्मात समाविष्ट करण्यात आलं. लग्नानंतर मला ४ मुले झाली आहेत, त्या मुलांसाठीच माझा



छळ होत असतानाही मी सासरी राहिल्याची कबुली सायलीने धर्मांतरानंतर दिली आहे.

पुण्याच्या पिंपरी चिंचवडमधील रहिवासी असलेल्या सायलीने २०१९ मध्ये मीरा भाईंदर शहरातील प्रसिद्ध उद्योजक आतिफ तासेसोबत लग्न केलं होतं. विशेष म्हणजे सायलीच्या लग्नास कुटुंबीयांचा विरोध होता, पण घरच्यांचा विरोध झुगारून तिने आतिफसोबत लग्न केलं. मात्र, आतिफशी लग्न करणे आपली चूक होती, लग्न झाल्यानंतर सासरी सातत्याने आपला छळ करण्यात आल्याचं सायलीने हिंदू धर्मात घरवापसी केल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितलं. लग्नानंतर कुटुबीयाकडून माझा छळ करण्यात आला, आणि आपलं धर्मांतरण देखील केल्या गेलं. याबाबत अनेकवेळा आपण पोलिसांकडे तक्रार केली होती. मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नसल्याचं देखील सायली यांनी म्हटले. पोलीस प्रशासनाकडे अनेक प्रयत्न केल्यानंतर आपण हिदुत्वादी संघटनांच्या संपर्कात आलो आणि आता त्यांच्यामार्फतच आपल्याला हिंदू धर्मात प्रवेश दिल्याचेही सायलीने सांगितले. सायलीला परत हिंदू धर्मात घेण्यासाठी धर्प पद्धतीने होम हवन मंत्रोच्चार करण्याची प्रक्रिया राबविल्या गेली. विशेष म्हणजे खासदार मेधा कुलकर्णी आणि आमदार उमा खापरे यांच्यासह बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सायलीची हिंदू धर्मात वापसी करण्यात आली. याशिवाय, सायली सुर्वेच लग्नानंतर अतेझा तासे असं नामकरण करण्यात आलं होतं ते नाव बदलून शुद्धीकरण प्रक्रियेत पुन्हा तिचं नवं नामकरण करण्यात आलं आहे. आता, तिला अद्या सुर्वे हे नावं देण्यात आल्याची माहिती आहे.

## जुन्या वादातून पुण्यात गोळीबाराचा थरार! विदेशी बनावटीच्या पिस्तूल अन् जिवंत काडतुसांसह दोघांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याच्या गुन्हेगारी विश्वातून एक मोठी बातमी समोर आली आहे. यात जुन्या वादातून पुण्यात गोळीबार (झींपश ऋळीळपस) झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून दोघांना अटक केली असून पुढील तपास सुरु केला आहे. मार्केटयार्ड पोलीस ठाणे हद्दीत वखार महामंडळाजवळ हि गोळीबाराची (उीळाश छश्ुी) घटना घडली आहे. या गोळीबार प्रकरणातील दोन आरोपींना (झींपश उीळाश छश्ुी) पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक करून त्यांच्या ताब्यातून विदेशी बनावटीचे पिस्तूल, जिवंत काडतुसे तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. सध्या अधिक तपास पोलीस करत आहे. मात्र या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी जुन्या वादातून साहिल महेंद्रसिंग चव्हाण व बालाजी रामजी उमाप यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह मोजेश शेखापुरे या तरुणावर गोळीबार केला होता. या घटनेबाबत मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हाचा तपास करत असताना गुन्हे शाखेच्या पोलिसांना माहिती मिळाली होती की दोन्ही आरोपी नांदेड सिटी गेट परिसरात लपून बसले आहेत. त्या अनुषंगाने पोलिसांनी परिसर चारही बाजूंनी घेरून छापा टाकला.दरम्यान, पोलिसांनी अचानक झडप घालून दोन्ही आरोपींना कोणतीही संधी न देता ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून विदेशी बनावटीचे पिस्तूल व जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले. तसेच आरोपींकडे विचारपूस करून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. आरोपींकडे केलेल्या चौकशीतून गुन्ह्यात सहभागी असलेल्या अन्य आरोपींची नावेही निष्पन्न झाली असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त हाऊस कीपिंग कर्मचाऱ्यांचा हृदयस्पर्शी गौरव

**पुणे । प्रतिनिधी**

पहाटेच्या अंधारात जेव्हा शहर अजून झोपेत असते, तेव्हा त्या उठतात. झाडू, पोचा, बादली घेऊन त्या निघतात कुणाची वाट न पाहता, कुणाच्या कौतुकाची अपेक्षा न ठेवता. आपल्या परिसराची स्वच्छता आणि आरोग्य राखण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या या हाऊस कीपिंग महिला कर्मचाऱ्यांच्या कामाची आज खऱ्या अर्थाने दखल घेण्यात आली.

मंगल भैरव नांदेड सिटी, पुणे येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात आणि आगळ्यावेगळ्या प्रकारे साजरा करण्यात आला. 'मंगल भैरव उत्सव समिती' व 'अविनाश लगड युथ फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने मंगल भैरव सोसायटीतील तब्बल ३० हाऊस कीपिंग महिला कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला.



ज्या समाजात त्यांच्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते, त्याच समाजातील काही संवेदनशील मने एकत्र आली आणि या 'पडद्यामागच्या योद्ध्यां'साठी टाळ्यांचा कडकडाट केला. या भावपूर्ण सोहळ्यात सर्व ३० महिला कर्मचाऱ्यांना स्टेनलेस स्टीलच्या पाण्याच्या बाटल्या भेट म्हणून देण्यात आल्या.या कार्यक्रमाला भाग्यश्री अविनाश लगड (अध्यक्षा, अविनाश लगड युथ फाउंडेशन) या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच डॉ. पूनम बांबरकर, प्रा. कीर्ती दळवी, ज्योती देशमुख, संचालिका पल्लवी शिंदे, मुख्याध्यापिका जयश्री जावळे आणि दीपाली अरगडे यांच्यासह मंगल भैरव उत्सव समितीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी प्राध्यापक राहुल दळवी आणि सुनील भोंगाने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. केवळ सन्मान करून न थांबता, या महिलांच्या भविष्याचाही विचार करत त्यांनी बचत आणि विमा (इन्शुरन्स) काळाची गरज या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. आज मिळालेला सन्मान एका दिवसापुरता राहू नये, तर या महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हाच त्यामागचा हेतू होता.

## पुण्यात ट्रान्सजेंडरच्या वेषात लुटणारी टोळी सक्रिय; हडपसर पोलिसांनी तिघाना ठोकल्या बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

हडपसर पोलिसांनी ट्रान्सजेंडर असल्याचे भासवून एका कार चालकाला लुटल्याच्या आरोपाखाली तीन जणांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांची नावे सुखलाल शिंदे (२७), कैलास चव्हाण (२२) आणि अजय शिंदे (२३) अशी असून ते तिघेही हडपसरमधील वैदुवाडीचे रहिवासी आहेत. त्यांनी शनिवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास पुणे-सोलापूर महामार्गावर हडपसर येथील ४५ वर्षीय कार चालकाकडून ५,४०० रुपये रोख लुटले.

हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले यांनी सांगितले, हे तिघेही रस्त्यावर आणि चौकात भीक मागणाऱ्या ट्रान्सजेंडरचे रूप धारण करून फिरत होते. पीडित चालक आपल्या कुटुंबासह पंढरपूरला दर्शनासाठी जात होता. कार लाल सिग्नलवर थांबल्यावर हे 'ट्रान्सजेंडर' वाहनाजवळ आले. चालकाने आपल्या पाकिटातून त्यांना २० रुपये दिले. मात्र त्यावेळी संशयितांनी पाकिटात असलेली रोख रक्कम पाहिली. त्यानंतर त्यांनी चालकाचे पाकीट हिसकावून पळ काढला. चालकाने तात्काळ पोलिसांना फोन केला. जवळच तैनात असलेल्या पोलिसांच्या पथकाने त्यांचा पाठलाग करून तिघांना अटक केली. चौकशीदरम्यान ते ट्रान्सजेंडर नसून पुरुष असल्याचे उघड झाले.

## डॉ.आंबेडकर महाविद्यालयात मंगळवारी राज्यस्तरीय परिसंवाद

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या येरवडा येथील डॉ.आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यावर एक दिवसीय राज्यस्तरीय परिसंवाद मंगळवारी (दि.१०) घेण्यात येणार आहे. महाविद्यालयात सकाळी १० वाजता परिसंवादाचे उद्घाटन होणार आहे.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, उपाध्यक्ष डॉ. डी. जी. देशकर, सचिव संजीव बोधनकर, प्राचार्य डॉ. गौतम बनसोडे,




आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. रुपेश थोपटे, सुप्रसिध्द राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. प्रमोद हिरोडे, परिसंवादाचे समन्वयक प्रा. शिवाजी मोटेगावकर, प्रा. कैलास शिंदे आदी उपस्थित राहणार आहेत. डॉ. पंडित विद्यासागर यांचे बीजभाषण होणार आहे परिसंवादात पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांचे वंचित घटकांसाठी उच्च शिक्षणातील संधी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे डॉ. नवनाथ तुपे यांचे नवीन शैक्षणिक धोरण : वास्तव आणि आव्हाने, आयआयईचे सहयोगी प्राध्यापक डॉ.विकास माने यांचे उच्च शिक्षण धोरण : आव्हाने आणि दिशा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रातील प्रा. डॉ. ललित भवरे यांचे उच्च शिक्षण आणि महिला या विषयावर व्याख्यान होणार आहे.

## एमपीएससी राज्यसेवा मुख्य परीक्षा पुढे ढकलली

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीकडून २७ फेबुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार राज्य सेवा मुख्य परीक्षा - २०२५ आयोगाच्या नियोजित वेळापत्रकानुसार २९ मार्च ते २६ एप्रिलदरम्यान घेण्यात येणार होती. परंतु काही उमेदवारांनी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी संबंधित परीक्षा पुढे ढकण्याबाबत आयोगाकडे विनंती केली होती. उमेदवारांच्या विनंतीचा विचार करून आयोगाने परीक्षेचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार संबंधित परीक्षा आता ५ एप्रिल ते २ मेदरम्यान होणार आहे. पूर्वपरीक्षेत पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी १४ मार्चपर्यंत परीक्षा अर्ज भरता येणार आहे.

आयोगातर्फे गेल्या वर्षी मार्च महिन्यात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर या वर्षी ८ जानेवारी व २० फेबुवारीला शुद्धिपत्रके प्रसिद्ध करत वाढीव पदांचा समावेश केला. त्यानुसार आता एकूण १३९ पदांच्या भरतीसाठी परीक्षा प्रक्रिया राबविली जात आहे. निवडप्रक्रियेच्या पुढील टप्प्यात पूर्वपरीक्षेमध्ये अर्हतापात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२५ चे आयोजन केले आहे. ५ एप्रिल ते २ मे या कालावधीत ही परीक्षा घेतली जाणार आहे. राज्यातील नाशिक, पुण्यासह अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नवी मुंबई या शहरांतील परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाणार आहे.

यापूर्वी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांवर आधारित परीक्षा घेतली जात होती. परंतु या परीक्षा पद्धतीमध्ये बदल करताना आता वर्णनात्मक स्वरूपात परीक्षा घेतली जात आहे. त्यामुळे परीक्षेत यश मिळविताना उमेदवारांचा कस लागणार आहे. भाषा पेपर-एक आणि भाषा पेपर-दोन, प्रत्येकी तीनशे गुणांचे असतील. २५ टक्के गुणांसह अर्हता ग्राह्य धरली जाईल. गुणवत्तेसाठी गणना करण्यासाठी एकूण एक हजार ७५० गुणांच्या पेपर क्रमांक तीन ते नऊचे मूल्यमापन केले जाईल. मुलाखतीसाठी २७५ गुण असतील.

## आळंदीतील आध्यात्मिक शिक्षण संस्थेवर बंदी; ४७ बालकांचे पुनर्वसन

**आळंदी । प्रतिनिधी**

आळंदी येथील जाहुरकर महाराज आध्यात्मिक शिक्षण संस्थेवर बंदीची कारवाई करण्यात आली आहे. या संस्थेतील ४७ बालकांचे शासकीय बालगृहात पुनवर्सन केल्याची माहिती मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिली. या संस्थेत आध्यात्मिक शिक्षण घेणाऱ्या १२ वर्षीय मुलीवर शारीरिक व मानसिक शोषण झाल्याचे उघडकीस आले आहे. याबाबत गुन्हा देखील दाखल झाला आहे. यावर तातडीने दखल घेत या संस्थेवर बंदीची कारवाई केली. संस्थेतील ४३ मुले व ४ मुलींना तीन शासकीय बालगृहांमध्ये सुरक्षितपणे हलविण्यात आले आहे.

मुख्याधिकारी खांडेकर यांच्या नेतृत्वात शनिवारी (दि. ७) सकाळी ११ वाजता नगरपरिषद अधिकारी, आळंदी दामिणी



महिला पोलिस पथक आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अधिकारी यांनी संस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीत त्यांना अनेक गंभीर त्रृटी निदर्शनास आल्या. महिला व बालविकास विभागाच्या ३ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार अनधिकृत व नियमभंग करणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. त्या अधिकाराचा वापर करत संस्था तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले. या कारवाईत मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या समवेत आळंदीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके, नगरपरिषद कर व प्रशासकीय सेवा विभाग सीमा चारभे, लेखापरीक्षक प्रदीप आवारी, सहायक प्रकल्प अधिकारी वैशाली पाटील, अभियंता मिथिल पाटील, कर्मचारी नाना घुंडरे, आळंदी पोलिस दामिणी पथकाच्या पूजा नाईक, श्वेता शेलकर, समुदाय संघटक अर्जुन घोडे, बाल संरक्षण अधिकारी शत्रुघ्न खोकले, पोलिस कर्मचारी मच्छिंद्र शेंडे उपस्थित होते. मुलांना निवासी ठेवण्याचा परवानाच नाही

संस्थेत विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज व आधार कार्ड नोंदी नव्हत्या. पालकांचे प्रवेश अर्ज व छाननी समिती अस्तित्वात नव्हती, नियमानुसार कर्मचारी वर्ग उपलब्ध नव्हता, अभ्यासिका व भोजन हॉल एकाच खोलीत होते. स्वयंपाकघर व निवासाची जागा अपूरी होती. पुरेशी व हवेशीर स्नानगृहे-स्वच्छतागृहे नव्हती. भोजनाचा निश्चित मेनू नव्हता आणि विद्यार्थ्यांनी दिलेल्या माहितीनुसार रात्रीचे उरलेले अन्न सकाळी दिले जात होते. याशिवाय गेट रजिस्टर, प्रथमोपचार पेटी, तक्रार पेटी आणि नियम-अटींचे फलकही संस्थेत नव्हते. तपासणीत सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे संस्थेकडे मुले व मुली निवासी ठेवण्याचा शासनाच्या कोणत्याही विभागाचा वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाले.

## आंबेगावमध्ये अवैध गौणखनिज वाहतुकीवर कारवाई

**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव तहसील कार्यालयाने अवैध गौणखनिज वाहतुकीविरोधात कठोर मोहीम सुरू केली आहे. यादरम्यान दोन डंपरविरोधात कारवाई करण्यात आली आहे. तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी याबाबत माहिती दिली.

तालुक्यातील विविध भागांत अवैध माती, मुरूम व वाळू वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आली आहेत. तहसील कार्यालयाच्या वतीने सहा मंडळांमध्ये सहा प्रतिबंधक पथके स्थापन करण्यात आली आहेत. आंबेगाव मंडळ (पेसा क्षेत्र), निरगुडसर मंडळ-पारगाव मंडळ परिसरात तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान अवैध माती व मुरूम वाहतूक करणाऱ्या दोन डंपरवर कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान दोन डंपरमधून अवैध गौणखनिज वाहतूक होत असल्याचे आढळून आले. संबंधित वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. तालुक्यातील विविध भागांत अवैध खनिज उत्खनन व वाहतुकीच्या तक्रारी येत असल्याने महसूल प्रशासनाने ही मोहीम अधिक तीव करण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांनीही अवैध वाळू, माती किंवा मुरूम वाहतूक होत असल्याची माहिती तत्काळ तहसील कार्यालयाला द्यावी, असे आवाहन केले आहे. तक्रार करणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

cmyk